
# भावबंध पंचक हे

## २



कुमारी शक्तिलीला

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# भावबंध पंचक हे!-2

## निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेली ही महाकादंबरी. एका भव्य कादंबरीचा दुसरा भाग.

ही तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या महाकादंबरीच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं. ती महाकादंबरी सर्वार्थाने "महा" होण्यासाठी.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# भावबंध पंचक हे!-2


## निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : २१ डिसेंबर २०२१ (मार्गशीर्ष व. चतुर्थी १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## *भावबंध पंचक हे!२*

-निकिता राजेश पाटील

## परिचय



नाव:-निकिता राजेश पाटील.

वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

कथालेखन काव्यवाचन अशा स्पर्धांत सक्रिय सहभाग.

वाङमयीन परिचय:-१) संस्कृत चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२)विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त "द्रौपदीचे आत्मकथन" हा ललित लेख व "मनाचे प्रदूषण" ही कविता व "बायको नावाचं अजब रसायन" ही विनोदी कथा प्रकाशित.

३) टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत” ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन-फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

४) बदलापूरच्या कविसंमेलनात कविरुपात काव्यवाचन.

५) अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर” या लेखाचे लेखन.

६)मानवविद्या विभागात “वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व” या विषयावर संशोधन.

७) निबंध व वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक.

८) ई-साहित्यवर ७ पुस्तकं प्रकाशित.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत.त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- विद्यार्थिनी- एसवाय बीए.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६ 👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

जिच्याशी माझे

जन्मोजन्मीचे

तसेच भावबंध जुळलेले

आहेत,

, त्या महन्मातेच्या चरणी

समर्पित.

# उपोद्घात

*द्रौपदी! महाभारताची महानायिका ! जिचा प्रवेश महाभारतात झाल्यानंतर जिच्यावरच भारतीकथा केंद्रित झाली आहे व जिने युगपरिवर्तन घडवले, अशी लोकोत्तर व्यक्तिरेखा !*

*ही व्यक्तिरेखा २०१५ पासून माझ्या मनात आहे. प्रथमतः मी वयाच्या बाराव्या वर्षी द्रौपदीच्या जीवनावर आधारित कल्पित कथा लिहिल्या. ज्या शिक्षकांनी या कथा वाचल्या, त्या कथा त्यांना सत्यच वाटल्या. त्यानंतर मी द्रौपदीच्या जीवनावर आधारित चित्रकथा लिहिली. परंतु ती अपूर्णच राहिली.*

*त्यानंतर माझ्या मनात असलेले स्वप्न २०१७ ला पूर्ण झाले. माझी प्रकर्षाने इच्छा होती, की मी द्रौपदीचे पात्र रंगमंचावर साकार करावे. तेव्हा मला सांस्कृतिक कार्यक्रमात 'द्रौपदीचे स्वगत' हा एकपात्री प्रयोग करण्याची संधी मिळाली.*

*खरं पाहता, द्रौपदीचा आयुष्यपट इतका व्यापक आहे, की ३ मिनिटांच्या स्वगतात द्रौपदीचे जीवन सामावून घेणे अत्यंत दुष्कर कार्य होते. द्रौपदीच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना वेचून संक्षिप्तात*

*‘ द्रौपदीचे स्वगत’ लिहिण्यासाठी मला तब्बल दोन तीन दिवस लागले, तर अभिनयाच्या सरावासाठी पंधरवडा.*

*परंतु त्या अभिनयातून मला एक सुंदर आणि बोधप्रद अनुभव आला होता, जो मी कधीच विसरू शकत नाही.*

*तो अनुभव असा होता,*

***“ जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तिरेखेला अभिनय किंवा लेखनरूपाने आवाज देत असता, तेव्हा परकायाप्रवेशापेक्षा परविचारसंज्ञान महत्त्वाचे असते, कारण ती भूमिका करताना वा त्या भूमिकेतून लिहिताना स्वतःच्या अस्तित्वाचे व पात्राच्या व्यक्तिमत्त्वाचे भान ठेवावे लागते.”***

*मी हे आतापर्यंत लक्षात ठेवलेलं आहे, व नंतरही मी लक्षात ठेवणार आहे.*

*पुढे नंतरच्या काळात मला द्रौपदीविषयी लिखाण करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यासाठी मी महाभारत व द्रौपदीच्या जीवनावर आधारित कादंबरी तसेच ग्रंथांचा अभ्यास केला. जननीमाईंच्या कृपेने मला विभिन्न पुस्तके उपलब्ध झाली.*

*मात्र मला सर्वांपेक्षा वेगळे आगळे लिहिण्याची कामना होती, आहे. त्यामुळे मी पांडव व द्रौपदीच्या नातेसंबंधांवर आधारित*

*महाकादंबरी लिहिण्याचे ठरविले. जननीमाईंच्या प्रेरणेने ती महाकादंबरी लिहून झाली.*

*मी पांडव -द्रौपदीचे नातेसंबंध इंद्रप्रस्थातील निवडले नाहीत. ते सर्वविदित आहेतच.*

*याउलट मी वस्त्रहरणानंतरचे अन् वनवासातील पांडव-द्रौपदीचे नातेसंबंध निवडले आहेत. कारण वस्त्रहरणानंतर त्यांच्या नात्यांत पडलेला काहीसा फरक, आलेला तणाव, तेढ व द्रौपदीच्या मनाची व्यथाही मांडण्याचा प्रयत्न केला आहे.*

*याशिवाय मोठमोठे संवाद, अलंकारिक शब्दरचना आणि अधिकाधिक विशिष्ट शब्दांचा वापर हे माझ्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे, हे या महाकादंबरीतून जाणवेलच!*

*याखेरीज मी या कादंबरीच्या प्रथम भागाचा शेवट द्रौपदी-सत्यभामा संवादाने केला आहे. खरं पाहता, मला या संवादाचं अप्रूपच वाटतं. द्रौपदीने नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, राजनीती, अर्थशास्त्र यांचा जितका अभ्यास केला होता, तितकेच तिचे सखोल चिंतन मानसशास्त्रातही होते.*

*मी आज वैकासिक व सामाजिक मानसशास्त्रात वैवाहिक जीवनात कसे वागावे, एकमेकांमध्ये कसं विश्वासाचे नाते निर्माण*

*करावे, त्याकरिता आवश्यक असणाऱ्या कोणत्या आदर्श तत्वं, मूल्यांचे पालन करावे, जोडीदाराच्या मनातील भाव कशा प्रकारे समजून- जाणून घ्यावे, याविषयी वाचले आहे. परंतु ५,००० वर्षांपूर्वी पांचालीने केलेली या सर्वांविषयीची प्रतिपादने अत्यंत प्रगल्भ व परिपक्व विचारांनी परिपूर्ण आहेत, वैवाहिक जीवनातील समस्यांबाबत आजही चिंतनप्रवृत्त करायला लावणारी आहेत.*


*आणि याशिवाय युद्धानंतर पाण्डव- द्रौपदीच्या नात्यांमध्ये आलेला पुनः तणाव नि त्यातून उद्भवणारी विरक्ती हे भावबंध रेखाटण्याचाही मानस आहे. जननीमाईंच्या कृपेने ते भावबंधही पूर्ण होतील.*

*द्वितीय भागाची प्रतीक्षा करावी.*

निरंतरमस्तु ॥

भावबंध पंचक हे!२ -निकिता राजेश पाटील  वाचण्यापुर्वी भाग १ वाचण्याची जिज्ञासा असणाऱ्यांसाठी

कव्हरवर क्लिक करून आपण ते विनामूल्य डाऊनलोड करू शकता



# द्वितीय दलाची प्रस्तावना

भावबंध पंचक हे या महाकादंबरीचे हे द्वितीय दल आहे. खरं पाहता, माझी इच्छा अशी आहे की माझी ही महाकादंबरी त्रिदलात्मक व्हावी. आणि शक्तीच्या कृपेने तृतीय दल देखील मी लिहायला घेतले आहे.

प्रथमतः या दलाचा परिचय करून देणे आवश्यक आहे .

सर्वप्रथम मुखपृष्ठावरील चित्राचा आशय मी सांगते. या चित्रात पुत्रविरहाच्या शोकाने व्याकूळ झालेल्या पांचालीला भीमसेन मणी देत आहे, व अन्य पांडव, कृष्ण तसेच व्यास तिचं सांत्वन करताहेत, मात्र ती तो मणी युधिष्ठिराला देऊ पाहत होती.

या चित्राचा इतकाच आशय आहे की हे द्वितीय दल युद्धानंतर पांचाली- पांडवांच्या जीवनात आलेली स्थित्यंतरे, वादळे, समस्या आणि द्विधेच्या परिस्थिती- मन: स्थिती या सर्व परिवर्तनावर आधारित आहे.

ह्या द्वितीय दलामध्ये युध्दाचे द्रौपदी- पांडवांच्या नातेसंबंध, भावबंध, मनोमस्तिष्क, निर्णयक्षमता, विचारशक्ती आणि

*धैर्यशीलतेवर धनात्मक वा ऋणात्मक झालेले परिणाम मी चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.*

*आणि हेच परिणाम आपल्याला अत्यंत भयावह झालेले दिसतात.*

*द्रौपदीच्या शब्दांप्रमाणे :-*

*“ अभ्युदय आणि विपत्ती ही दोन्ही जीवनाची चक्रे आहेत. सुखानंतर दुःख व दुःखानंतर सुख अशी साखळी चालू असते. विपत्तीतही लोक अभ्युदयाची प्रतीक्षा करत असतात. कारण त्यांना हे ज्ञात असतं की दुःखानंतर सुख असतेच. परंतु आपल्या जीवनात सुखाचे फक्त काही क्षण आले, मात्र एक विपत्ती जर आली असता विपत्तींवर विपत्ती कोसळल्या आहेत.”*

*या शब्दांचा अर्थ इतकाच की युद्धासारखी महाआपत्ती कोसळल्यावर व स्वतःच्या ज्ञाति बांधवांचा तसेच वंशाचा नाश झाल्यावर पांचालीला व पांडवांना अनेक धर्मसंकटांना, द्विधा तसेच मानसिक तणावांना सामोरे जावे लागले. त्यांच्यापुढे अनपेक्षित आव्हाने व विपदा उभ्या ठाकल्या होत्या.*

*त्याचा थोडा उल्लेख या दलामध्ये केला आहे,तर विस्तृतपणे मी तृतीय दलामध्ये मांडेन.*

*या दलामध्ये सर्व विदित असणारे काही प्रसंग मी वेगळ्या पद्धतीने अधोरेखित केले आहेत.*

*या शिवाय काही प्रसंग कल्पनास्फुरित असले, तरी ते सर्व प्रसंग वास्तविक तत्कालीन परिस्थितीला धरून तर्कसंगत आहेत.*

*मला खात्री आहे की तुम्हां वाचकांना माझी ही लेखन शैली निश्चितच आवडेल.*

*आता तृतीय दलही मी लिहण्यास आरंभ केला आहे. त्यामुळे ते शक्तीच्या कृपेने लवकरात लवकर पूर्ण होईल.*

***निरंतरमस्तु //***

# भावबंध पंचक हे !

## द्वितीय दल

- कुमारी शक्तिलीला
  (निकिता राजेश पाटील)



# चतुर्थ बंध

**ॐ श्री गुरवे नमः।**

**ॐ श्री प्रेरणायै नमः||**

**इति||**

**अ**मावस्येची रात्र होती. सर्वत्र अंधःकार होता. स्वतःच्या वंशाचा असा भयानक विध्वंस याचि नेत्रीं याचि देही पाहिल्याकारणे दुःखाश्रित झालेल्या चंद्राने स्वतःला मेघांच्या महालात कोंडून घेतले होते.

सुतकाच्या श्वेत प्रभावाखाली संपूर्ण नगरी होती. प्रत्येक गृहातील, प्रत्येक राहुटीतील-राजप्रसादाच्या प्रत्येक कक्षातील दीपक मालवले होते. शोककळेने राष्ट्रध्वज खाली झुकला होता, वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांना आदर देण्याकरिता! फक्त आदरच नव्हे तर सहानुभूती देण्याकरिताही. दोन्ही शत्रूंच्या वैराग्नीत कित्येक नरेशांना, सामंताना व निरपराध सैन्यालाही भस्मीभूत व्हावे लागले. याशिवाय भावी राज्यकर्ते असणाऱ्या तरूण- तरुण राजपुत्रांनीही आपल्या माता-पित्यांसाठीही आपले बलिदान दिले होते. म्हणजे

आता राज्यकर्तेही उरले नव्हते. फक्त वृद्ध,अनाथ बालके आणि विधवा स्त्रिया. याचा दोष पांडुपुत्रांना दिला जात होता व पांडवांची बोटं द्रौपदीवर अस्फुष्ट प्रश्नचिन्ह करत होती. तसं म्हणजे, कर्णवधाच्या शोकाच्या भरात पांडवांनी संपूर्ण संहाराचे कारण कुंती व द्रौपदीलाच ठरविले होते. युधिष्ठराने तर संपूर्ण नारीजातीलाच शाप दिला होता.

जे काही घडलं, ते सर्व पांडवांच्या उद्वेगाच्या आकस्मिक उद्रेकाचा अविवेकी परिणाम होता. त्याच आकस्मिक भावनिक उद्रेकाकारणे पांडव स्वतःच दुखःचक्रात अडकलेले.

द्रौपदी, कुंती अन् अन्य पांडवस्त्रिया-कौरवस्त्रियाही दुःखी होत्या. प्रत्येकीच्या दुःखाचे कारण वेगळे असलं तरी प्रत्येकजणीच्या हातात प्रियजनांच्या शवांची राख होतीच.

भानुमती,पुरुष्णी,वसुंधरा, आदिती व लक्ष्मणादि कौरव स्त्रिया नि कौरवकन्या आपल्या पिता-पुत्र अथवा पतीच्या मृत्यूकारणे आपलं सर्वस्व गमावून बसलेल्या होत्या. याखेरीज त्या सर्वजणीही द्रौपदीलाच दोषी मानत होत्या.

त्या सर्व कौरवस्त्रिया एकांतिक कक्षात शोकवस्त्रे धारण करून बसल्या होत्या. त्यांच्या सात्वनार्थ पांडवांनी द्रौपदीला बलंधरेसह कौरवस्त्रियांच्या महालात जाण्याची आज्ञा दिली.

" द्रुपदकन्ये! तू भानुमतीला,पुरुष्णीला धीर दे. सर्व कौरवस्त्रियांचे सांत्वन कर." युधिष्ठिराने द्रौपदीला म्हटले.

" मी का?आर्यपुत्र······." द्रौपदीने शंकित होत विचारलं.

" आणि मीही का? भगिनी भानु माझ्यावरही क्रुद्ध होईल. माझ्याच पतीने तिच्या पतीचा वध केला आहे." बलंधरेने म्हटले.

" बलंधरे, मी काही अनुचित केलं आहे असं तुला वाटतं का, आम्हा पांडवांचा-पांचालीचा अवमान करणाऱ्या दुर्योधनाचा वध केला, ते अनुचित होतं का? भीम प्रक्षुब्ध झाला.

"आर्यपुत्र भीमसेन, आपण आपल्या प्रतिज्ञेनुरुप दुर्योधनाची मांडी फोडलीत म्हणजे गदायुद्धाच्या नियमाचा भंग केलात, असा आपल्याविषयी कुरुकुळाच्या स्त्रियांमध्ये रोष आहे." द्रौपदीच्या शब्दांवर भीमाने उसासा टाकला. "त्या अंध नृपाप्रमाणेच ना?"

“अर्थातच! म्हणून द्रौपदीने या अजाण बलंधरेसह जाणं योग्य नाही. तिने बलंधरेसमवेत सुभद्रा तसेच पौरवीला घेऊन जावं! सहदेवाने म्हटले.

“सुकुमार भद्रेला कशाला?” अर्जुनाने चाचरत विचारले.

“ती लक्ष्मणेची श्र्वसू आहे, त्याकारणे ती लक्ष्मणेला समजावू शकेल.” नकुल म्हणाला, “पौरवीला काही कार्य नको का? तीही दु:शलेला सांत्वना देऊ शकते.”

“ ठीक आहे, कल्याणी! तू बलंधरा, पौरवी अन् भद्रेला घेऊन जा व त्या स्त्रियांना कौरवांच्या अंत्यसंस्कारांपूर्वी आपल्या पतींचे अंतिम दर्शन घेण्यासाठी स्मशानात घेऊन ये.” युधिष्ठिराने पांचालीला आदेश दिला.

“आम्ही तेथे तुझी प्रतीक्षा करणार आहोत. तुला येतां- येतां एक महत्त्वाचे कार्य करायचे आहे. अर्जुनाचा स्वर विषण्ण होता. तू येता- येता अंत्यसंस्कारांकरिता पुरोहित-चांडालांची तसेच त्याकरिता आवश्यक असणाऱ्या सामग्रीची व्यवस्था करून घे.”

“द्रौपदी! तूही आभूषणविरहित होऊन शोक अजिने धारण कर, फक्त सौभाग्यचिन्हे अंगावर असू दे.” नकुलाने म्हटले, “हे सम्राज्ञीचे कर्तव्यच असते.”

“आज्ञा प्रमाण! असं म्हणून द्रौपदीने आपल्या रंगीत वस्त्रांवर फिके श्वेत-सुती शोक-अजिन लपेटले व ती अन्य सपत्नींसमवेत कुरुस्त्रियांकडे निघाली.

हे द्रौपदीकरिता अत्यंत अवघड असे दिव्य होते.

“त्या क्रूरकर्म्या भीमाने माझ्या पतीचा इतक्या क्रौर्याने वध केला आहे की मला माझ्या पतीचं शवही पाहवणार नाही.” पुरुष्णीच्या दुःखातही क्रोध होता.

“माझ्या पतीची मांडी फोडून गदायुद्धाचा नियमभंग त्याने केलाच केला, तर माझ्या पतीच्या मस्तकावर त्याने लत्ताप्रहार केला.” भानुमती म्हणाली.

“मात्र आमच्या पतीचा त्याने क्रौर्याने वध केला नाही. आमच्या पतीला त्याने अत्यंत शमकारी मृत्यू दिला, कमी वेदना देता! वसुंधरा व सावित्री म्हणाल्या.

अशा तऱ्हेने सर्व कौरवस्त्रिया शोक करत होत्या. त्या पांडवांविषयी विशेषतः भीमाविषयी संताप व्यक्त करत होत्या.

"अरे, अजूनही तुम्ही इथेच? हे कार्यच इतकं महत्त्वाचे आहे की आपण टाळू शकत नाही. तितक्यात तेथे सविता आली, "मला ज्ञात आहे तुम्ही सर्वजण दु:खी आहात परंतु······"

"सविते! तुला हे बोलायला सुलभ वाटते. युयुत्सुने तर त्या पांडवांच्या पक्षात राहून युद्ध केले. म्हणून तू अजूनही सौभाग्यवती आहेस!" भानुमतीचे शब्द ऐकून सवितेचं मन थरथरलं. तशी ती धैर्य साधत म्हणाली, "परंतु ज्येष्ठ याते! पांडवपक्षातीलही योध्दे धारातीर्थी पडले आहेत. पांडवपक्षीयांच्या स्त्रियाही विधवा झाल्या आहेत.किशोरवयीन उत्तराही विधवा झाली आहे."

"मला हे सर्व मान्य आहे, परंतु हे सर्व काही कुणामुळे घडलं?" भानुमतीने म्हटले.

तत्क्षणी द्रौपदी आपल्या सपत्नींसमवेत त्या कक्षात प्रवेशली.

"सविते, हेच ते महायुद्धाचे कारण!" भानुमतीचे क्रुद्ध बोल ऐकून द्रौपदीला दुःख वाटले अन् अपराधीभावनादेखील.

“भानुमती, तुला खरंच वाटतं का, मी महायुद्धाचे कारण आहे?” द्रौपदीने दुखावल्या स्वरात विचारले.

“भगिनी भानु! तू तरी असं म्हणू नकोस. जे काही घडलं, त्यात दुर्योधनाचाच अपराध होता. तू का पांडवांना अथवा द्रौपदीला दोषी ठरवितेस!” बलंधरा भानुमतीच्या शब्दांकारणे दुःखी झाली.

“परंतु भानुमती अनुचित म्हणते आहे. असा दोषारोप करणेही योग्य आहे का?” पौरवीच्या शब्दांचा स्पष्ट रोख द्रौपदीकडे होता.

“असे आपण म्हणू शकत नसलो, तरी आपण भानुमतीच्या या आरोपास उचित मानू शकत नाही.” सुभद्रेने पौरवीच्या शब्दांना स्पष्ट विरोध दर्शविला.

“सुभद्रे , पौरवी! हा वाद-प्रतिवाद करण्याचा समय नव्हे, मी भानुमतीला समजाविते.” द्रौपदीने त्या दोघींना शांत राहण्याकरिता सूचित केले.

तशा दोघीही शांत झाल्या.

“भानुमती, जे काही घडलं, त्यात माझा खरंच दोष होता, आहे?” द्रौपदीने भानुमतीला विचारले.

“द्रौपदी! तू याविषयी काहीच बोलू नकोस.” भानुमती रोषाने म्हणाली, “पांचाली! तुझ्याकडे अविच्छेद्य अन् अभेद्य तर्क आहेत. तू आपल्या तर्कांनी मला सहज परास्त करशील गं, मी केलेला दोषारोप तू असत्य ठरवशील. मात्र जे सत्य आहे, ते सत्य आहे. तू कुठलेही तर्क विशद केलेस तरी सत्य बदलणार नाही.”

“कसले सत्य, भानुमती?” सुभद्रेने विचारले.

“भद्रे, जर द्रौपदीने आपले केश मुक्त ठेवले नसते व पांडवांना युद्धप्रवृत्त केले नसते, तर आमच्या अंगावर मंडित असलेली सौभाग्यचिन्हे अशी लुप्त झाली नसती.” पुरूष्णी रुदन करत म्हणाली.

हे शब्द ऐकून द्रौपदीला पीडा झाली. परंतु इतकी नव्हे, जितकी पीडा पांडूपुत्रांनी दोषारोप केल्यानंतर झाली होती.

“परंतु द्यूतसभेत घडलं, ते निश्चितच समर्थनीय नव्हतं.” बलंधरेने म्हटले, “भगिनी, कौरवांनी आपल्या ज्येष्ठ भ्रात्याच्या पत्नीशी जो दुर्व्यवहार केला, त्याला पांचालराजकन्येची प्रतिज्ञा हेच खरे प्रत्युत्तर होते.”

“बलंधरे, तू जरा शांत हो.” असं म्हणून द्रौपदीने भानुमतीचा हात हाती घेऊन म्हटले, “ मला कळते आहे, भानुमती! की आता तर्क-वितर्काचा समय नाही. जे काही घडलं, ते का,कसे घडले याचा विचार करण्यापेक्षा या दुःखातून एकत्रितपणे सावरण्याचा हाच समय आहे. म्हणून आपण आपल्या प्रियजनांना तिलांजली देण्याचे कर्तव्य पूर्ण करूया.”

“आम्ही आपल्या प्रियजनांची प्रेते धुंडाळून स्वतःच आपल्या प्रियजनांना तिलांजली देऊ. आम्हाला तुझ्या सहाय्यतेची अथवा सांत्वनाची आवश्यकता नाही.” असं म्हणून भानुमती उठली, “खरंच हा समय प्रियजनांना अंतिम निरोप देण्याचे कर्तव्य करण्याचा आहे.”

“पौरवी व सुभद्रे! तुम्ही उभयंता या कुरुस्त्रियांना घेऊन सर्वप्रथम स्मशानाच्या दिशेने प्रयाण करा. मीदेखील पुरोहित-चांडाल तसेच अंत्यसंस्कारांकरिता आवश्यक असणाऱ्या सामग्रीची व्यवस्था करून येते.” तिच्या आज्ञेनुरुप पौरवी तसेच सुभद्रा कौरवस्त्रियांसह निघून गेल्या.

त्या कक्षात आता फक्त सविता, पांचाली आणि बलंधरा होत्या.

“भानुमती जे बोलली, ते दुःखाने- उद्वेगाने बोलली. त्या शब्दांना कृपया मनावर घेऊ नकोस, पांचालराजकन्ये! सवितेने म्हटले.

“मला त्याचे दुःख वाटत नाही. मात्र मला एकाच बाबीचे वैषम्य वाटते,की कुटुंब उद्ध्वस्त होवो अथवा स्वयं स्त्रीवर अन्याय होवो, त्याचा दोष स्त्रीलाच सदैव दिला जातो. असं का? असं का होतं, बलंधरे, सविते? का समाज स्त्रीलाच दोषी ठरवतो? पुरुष दोषी असूनही?” द्रौपदीने आपल्या नेत्रांत आलेले अश्रू पुसत म्हटले, ”आणि हे महायुध्द कौरव-पांडवांच्या पूर्वापारच्या परस्पर विद्वेष- शत्रुत्वातून उत्पन्न झाले होते. याशिवाय कौरव-पांडवांचा द्वेष बाल्यावस्थेपासून अंगारातील शलाकांसारखा फुलत आला होता, त्यामुळेच हा वणवा पेटला आणि त्यातच असा भीषण संहार झाला. माझ्या मातृकुलाचा तसेच माझा निर्वंश झाला अन्य पांडवस्त्रियांचीही मातृकुले ध्वस्त झाली,कौरवस्त्रिया व सेनानायकांच्या भार्याही विधवा नि त्यांची बालके अनाथ झालेली आहेत.”

“ परंतु वस्तुस्थिती हीच आहे की,प्रजाननही या युध्दाचा तुलाच दोष देताहेत.” सवितेने पांचालीच्या स्कंधावर हात ठेवला.

हे सर्व श्रवण करुन द्रौपदीच्या मनातील अपराध भावना पुनः जागृत झाली. किंतु तिच्या विवेकाने तिला सावरलं. जे काही घडलं, त्यात तिचा दोष नव्हता आणि तिचे ‘कर्मत्व’ ही नव्हते. त्याकारणे स्वतःचा दोष नसतां स्वतःला अपराधी मानणे हेही अप्राज्ञतेचे लक्षण असते.

परंतु दोष नसतांही ज्याची निंदा होते, तो तर त्रस्त होतोच ना! तरीही विवेकानेच त्या पीडेतही स्वतःला संयत करणे आवश्यक असते, हेच सत्य!

“अजून द्रौपदी कौरवस्त्रियांसमवेत स्मशानात कशी आली नाही?” युधिष्ठिर अस्वस्थपणे येरझाऱ्या घालीत होता, “ आपल्या सर्वांना कुरुस्त्रियांचे सांत्वन करायचे आहे.”

“आपण कौरवस्त्रियांचे सांत्वन करु शकतो. परंतु सुबलराजकन्या राजमाता गांधारीचे सांत्वन करणे आपणा सर्वांना

संभव नाही. ती तपस्विनी आहे. तिच्या नेत्रांत तेज आहे. तिच्यापासून आपण सावध राहायला पाहिजे. " सहदेवाने म्हटले, " याशिवाय तो अंध नृपही क्रुद्ध आहे. क्रोधात-प्रतिशोधात अत्यंत विघातक शक्ती असते. तोही आपला क्रोध आपल्यावर काढू शकतो."

"राजमाता कुंतीचेही सांत्वन शक्य नाही आपल्याला. त्याही आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या वधाकारणे दुःखी आहेत." नकुलाने म्हटले.

' " ते पाहा, द्रुपदनंदिनी कौरवस्त्रियांसह येत आहे. तिने निश्चितच आपलं कार्य पूर्ण केलं असेल." अर्जुनाने आपल्या अन्य भ्रात्यांना म्हटले.

पांचाली अन्य सपत्नींसमवेत कौरवस्त्रियांना घेऊन आली.

त्या सर्व कौरवस्त्रियांचे केश मुक्त ,शृंगारहिन आणि विस्कटलेले होते. त्यांच्या शरीरावर फिके- श्वेत वस्त्रे होती. त्यांनी पांडवांकडे पाहिले, नि विलाप करण्यास आरंभ केला.

"हे सर्व घडलं, ते तुझ्यामुळे! धर्मराजा, तू जर सामाचा मार्ग पत्करला असतास, तर आज आमच्या सर्वस्वाची राखरांगोळी

झाली नसती. मात्र तू व तुझे अन्य भ्राते सत्तालोलुप आहात ना···
·······"

"भानुमती, पुरुष्णी! कोण सत्तालोलुप आहे,हे काळानेच दाखवून दिले आहे. तुमच्या पतींनी सत्तेखातर वारंवार आमचे प्राण घेण्याचा प्रयत्न केला होता. आमची संपत्ती हिरावून आम्हाला वनांत जीवन कंठण्यास प्रवृत्त केले होते." भीमाला क्रोध आला.

"भीमसेना! तूच आमच्या पतींना किती क्रौर्याने मारलेस. अरे, कसाईही श्वापदांचे प्राण अशा प्रकारे घेत नसतो." कौरवस्त्रियांचे शब्द ऐकून भीमसेनाने पुनः प्रतिवाद केला, " कौरव श्वापदापेक्षाही
·······"

"भीमसेना! विवेकाने विचार कर. या कुरुस्त्रिया दुःखी आहेत. त्याकारणे त्या विलाप करताहेत. त्याकारणे त्यांच्याशी प्रतिवाद करणे युक्त नव्हे." अर्जुनाने भीमास शांत केले.

अर्जुनाचे शांत शब्द ऐकून कौरवस्त्रिया अधिक क्रुद्ध झाल्या अन् त्यांनी पांडवांच्या नामें तळतळाट करण्यास आरंभ केला.

त्यांच्या त्या तळतळाटातून- विलापातून स्वतःची कशीतरी मुक्तता करुन घेत पांडव आपल्या पत्नीसह कर्णाच्या प्रेतापाशी गेले.

तेथे वृषाली आपल्या पतीच्या- पुत्रांच्या शवांजवळ बसून रुदन करत होती. तिचा किशोर पुत्र-वृषकेतु तिला दृढपणे आलिंगन देऊन बसला होता.

“वृषाली!” द्रौपदीने वृषालीला साद घातली.

“पांचाली!” असे म्हणून वृषाली तिला आलिंगन देऊन अश्रू ढाळू लागली.

“वृषाली,सावर स्वतःला.” ह्या शब्दांवाचून द्रौपदीकडे आणखी काय होतं, सांत्वनार्थ!

“पांचाली, मी कशी सावरु? जे पांडव भ्रातृनिष्ठेची प्रौढी मिरवतात, त्याच पांडवांनी माझ्या पतीचा वध केला आहे. याशिवाय माझ्या अन्य पुत्रांचाही वध केलेला आहे. माझं सर्वस्वच नष्ट झालं आहे.”

“नाही, वृषाली! तुझं सर्वस्व अजूनही तुझ्या हाती आहे, वृषकेतुच्या रूपाने. त्याच्याकरिता तरी तू स्वतःला सावर. वृषकेतु हा तुझ्या आशेचा किरण आहे, कर्णाचेच प्रतिरूप आहे. मात्र तो हे सर्वकाही पाहून प्रचंड तणावग्रस्त -भयग्रस्त झालेला आहे. त्याच्याकडे पहा जरा.” द्रौपदीने म्हटले.

ते ऐकून वृषालीने आपले अश्रू पुसून आपल्या किशोर पुत्राला वारंवार जवळ घेऊन कवटाळले. ती काहीशी सावरली आणि तिने पांडवांना उद्देशून म्हटले,

"धर्मराज, मला वाटलं होतं; तुम्ही धर्मयुद्ध कराल. युद्धनीतीच्या सर्व नियमांचे पालन करून युध्द कराल. परंतु तुम्ही तर त्या सर्व नियमांना चूड लावलीत. सर्वप्रथम पितामह, आचार्य द्रोण, त्यानंतर माझ्या पतीचा व माझ्या पतीच्या मित्राचे अन्यायाने-अधर्माने प्राणहरण केलेत."

"तर तुझ्या पतीने माझ्या किशोरवयीन पुत्राला- अभिमन्यूचा अधर्मानेच प्राण घेतला, त्याचं काय?" भीमाला विवेकाचा परामर्श देणाऱ्या अर्जुनाचा विवेक अनियंत्रित झाला होता.

"धनंजया! तू तर आपल्या 'त्या' अधर्म्य-अनुचित कृतीचं समर्थन करुच नकोस. माझा पती निशस्त्र,रथहीन व भूमीवर असतां तू माझ्या पतीचा शिरच्छेद केलास. स्वतःच्या ज्येष्ठ भ्रात्याशी असं गर्हणीय आचरण केलेस?"

"मात्र अभिमन्यू हा कर्णाचा सहोढ होता, हे कर्णाला ज्ञात असूनही त्याने असंच अभिमन्यूचे प्राणहरण केले होते ना, अभिमन्यू

रथविहीन, निशस्त्र व भूमीवर असतांही!" अर्जुनाच्या स्वरात तीव्र दुःख व क्रोध होता.

"तसेच वृषसेन, प्रसेन आदि कर्णपुत्रही तुझे सहोढ किंबहुना तुला पुत्रवत् आहेत, तुला तेव्हा हे ज्ञात नव्हतं .किंतु पुत्रशोकाची पीडा तू तर जाणत होतास. शत्रूलाही पुत्रशोकाची पीडा होऊ नये, इतकी भयंकर पीडा असते ती. त्या वैषम्याचा स्वयं अनुभव घेऊनही तू माझ्या पुत्रांचा वध माझ्या पतीदेखत केलास." वृषाली आपल्या पुत्रांच्या शवांना कवटाळून पुनः रुदन करू लागली.

"तुझ्या पतीबाबत जे काही घडलं ,जे आमच्याकडून घडलं, ते अज्ञानापायी-अजाणतेपोटी घडलं. त्याकारणे तर्क-वितर्क करुन आपल्या पतीला निर्दोष सिद्ध करण्याचा प्रयास करू नकोस. त्यामुळे तुलाच पीडा होईल, ज्येष्ठ भ्रात्याची पत्नी-अंगराज्ञी." सहदेवाने समजावणीच्या स्वरात म्हटले.

"म्हणजे माझाच पती दोषी? तुम्ही दोषी नव्हतेच?" वृषालीचा क्रोध उसळला.

"आम्ही तुझ्याशी वाद- प्रतिवाद करू इच्छित नाही, अंगराज्ञी. आम्हाला इतकंच म्हणायचं आहे की, राजपुत्रांच्या एकस्व

स्पर्धेमध्ये कर्णाने निष्कारण अर्जुनाला ललकारले नसते तर, कर्ण-पांडवांमध्ये कधीच वैर निर्माण झाले नसते. जरी आपल्याला आपले वेगळे स्थान निर्माण करायचे असले, तरी कुठलाही एकस्व स्पर्धेत आगंतुकपणे शिरणे अनुचितच असते. दुसरे म्हणजे, कर्णाने द्रौपदीस्वयंवरात पण जिंकण्याचा प्रयत्न केला नसता, त्याला स्वयंवराच्या सर्व अटी ज्ञात होत्या- ‘ प्रतिस्पर्धी हा कुलीन असला पाहिजे' हे जर त्याने लक्षात ठेवले असते तर, त्याची स्वयंवरसभेत उपेक्षा झाली नसती. आणि शेवटचं, त्याने द्रौपदीचा अपमान केला नसता व त्याने अभिमन्यू- घटोत्कचाचे निर्घृणतेने प्राण हरण केले नसते, तरी आम्ही त्याचे प्राण घेतले नसते.” नकुलाने असं म्हणून आपले आख्यान संपविले.

ते ऐकून वृषाली पुनः विलाप करू लागली, “पांचाली, नकुलाचे शब्द सत्य आहेत. माझ्या पतीने तुझ्या स्वयंवरसभेत पण जिंकण्याचा प्रयत्न करायला नको हवा होता. अन् तुझ्या चारित्र्याविषयी बीभत्स शब्द उच्चारून तुझ्या वस्त्रहरणाकरिता दु:शासनाला प्रवृत्त करायला नको हवे होते. मला मान्य आहे, या सर्वांत माझ्या पतीचाही दोष होता.”

तसं पांचाली वृषालीला जवळ घेऊन तिचं सांत्वन करु लागली.

“वृषाली, शोक करू नकोस. वृषकेतुही शोकमग्न आहे. स्वतःला सावर.”

पांचालीचे धीर देणारे शब्द ऐकूनही वृषाली अधिकच अश्रू ढाळू लागली.

तत्क्षणी केयुश नामक सेवकाचा स्वर सर्वांच्या कानी पडला, “ सम्राट, महाराज धृतराष्ट्र, राजमाता गांधारी, राजमाता कुंतीचे आगमन झाले आहे.” केयुशाने पांडवांना महत्त्वाची वार्ता दिली.

पुत्रशोकाने पीडित असलेल्या त्या क्रुद्ध वृद्धाला आणि त्याच्या पत्नीला- जी आपल्या नेत्रांच्या तेजाने व तपाच्या सामर्थ्याने कुणालाही दग्ध अन् अभिशप्त करु शकत होती- त्या उभयतांच्याही क्रोधाला पांडूपुत्रांस सामोरे जावे लागणार होते.

•••... आणि त्याकरिता त्यांना आपल्या पतिव्रता भार्येची- पांचालीची नि त्यांचा योगक्षेम वाहणाऱ्या कृष्णाची आवश्यकता होती !

म्हणून त्यांनी पांचालीचा हात धरत कृष्णाला स्मशानात येण्यासाठी संदेश धाडला.

"विदुरा,युयुत्सु···... माझ्या प्रिय भ्रात्यांचे पुत्र- माझे सहोढ- पांडव कुठे आहेत रे? माझी ज्येष्ठ स्नुष्णा सदाचारिणी पांचाली कुठे आहे?" धृतराष्ट्राने विदुर-युयुत्सुना विचारले.

"तुझ्या ज्येष्ठ पुत्राशी मला बोलायचे आहे, कुंती." गांधारीने कुंतीचा हात चाचपत धरला.

"गांधारी, माझ्या ज्येष्ठ पुत्रासह माझी तपस्विनी-पतिव्रता स्नुष्णाही असेल." कुंतीने आपले अधर मुडपले.

तिच्या शब्दांचा अर्थ गांधारीच्या लक्षात आला. कुंतीला गांधारीच्या शापाचं अथवा तिच्या नेत्रांतील तेजांच भय वाटत नव्हतं. तिला असं वाटत नव्हतं , तिच्या पुत्रांना गांधारीपासून काही अपाय होईल. कारण कुंतीला तिच्या स्नुष्णेच्या पातिव्रत्य व सत्त्वाच्या सामर्थ्यावर पूर्णपणे विश्वास होता.

हे जाणवून गांधारी नीरव झाली.

तितक्यात निष्कांशाने पांडूपुत्रांच्या आगमनाची वर्दी दिली, "या महायुद्धाचे जेते, हस्तिनापुराचे, इंद्रप्रस्थाचे सम्राट असलेल्या

पांडुनंदनांचे आपल्या सहधर्मिणी- देवी द्रौपदीसह आगमन होत आहे. द्वारकाधीशही त्यांच्यासमवेत आहेत.”

पांडवांच्या आगमनाची वार्ता ऐकताच ते वृद्ध दांपत्य काहीसं सावध झालं. धृतराष्टाने मुखावर वरकरणी प्रसन्नता आणली. गांधारीने आपली कठोर मुद्रा तशीच ठेवली.

पावलांचा आवाज जवळपर्यंत येत राहिला व त्या दोघांनाही जाणवले की पांडव आपल्याजवळ येताहेत.

तेव्हा धृतराष्टाच्या चरणांना कुणाच्या तरी बोटांचा स्पर्श जाणवला.

संजयाने औपचारिकपणे धृतराष्टाला सांगितले, ”हे राजा, सम्राट युधिष्ठिर तुझे चरण शिवत आहे.”

ते ऐकून आपल्या हातांनी चाचपडत युधिष्ठिराचे स्कंध धरुन त्याला उठवत धृतराष्टाने म्हटले,” माझ्या सहोढा! माझ्या युधिष्ठिरा!”

“माझ्यामुळेच कुरुवंशाचा नाश झाला ना?” युधिष्ठिराने धृतराष्टाचे विचार जाणून घेण्याच्या हेतूने विचारले.

“नाही, ते सर्व त्या मंदबुद्धी दुर्योधनाकारणे घडलं आहे. तू तर सद्गुणी आहेस, तू धर्मराज आहेस.” धृतराष्टाने मायावीपणे

म्हटले," तूच सामवचनाचा पुरस्कार केला होतास. मात्र माझा दुष्ट पुत्र- त्याला सामाचं महत्त्व कळलंच नाही." असं म्हणून धृतराष्टाने युधिष्ठिराला अलिंगन दिले. त्याचे आवेगपूर्ण दृढ अलिंगन युधिष्ठिराला पीडादायक ठरतं होतं. म्हणून त्याने निकराने स्वतःला धृतराष्टाच्या अलिंगनातून सोडवून घेतले.

धृतराष्ट्राचे दांभिक आचरण पाहून अन्य पांडवांना- द्रौपदीला अत्यंत क्रोध आला. द्यूतसभेतही द्यूत चालू असताना धृतराष्ट्र अत्यंत आतुरतेने विचारत होता, "किम् जितम्?" त्याचे पुत्र द्रौपदीची विटंबना करत असताना त्याने मौनव्रत धारण केले होते. नंतर मात्र आपला डाव आपल्यावरच उलटत असताना त्याने आपल्यावरील दोष आपल्या 'मंदबुद्धी' पुत्रावर ढकलला. आजही तो तेच करत आहे.

"भीमा! माझ्या जवळ ये! मला हे आलिंगन दे. माझ्या प्राणप्रिय सहोढ भीम कुठे आहे? " धृतराष्ट्राने आलिंगनाकरिता आपले हात पसरले, " मला आलिंगन दे."

त्याचा क्रोध, उद्वेग, तिरस्कार, प्रतिशोधाची भावना, व पुत्रशोकाचं दुःख त्याच्या त्या जर्जर बाहूंमध्ये एकवटलं होतं. ते नव विष होतं.तो नवा लाक्षागृहाचा अग्नी होता. तो नवा द्यूतपट होता.

जो पांडवाच्या बलाला- भीमाला आपल्या बाहुपाशात गुदमरवून मारू इच्छित होता.

याच शंकेने पांचालीने अन कृष्णाने भीमाचे हात धरून त्याला अडविले, व त्रिशंप्तकाला भीमाचा लोहपुतळा पुढे करण्याचा संकेत केला.

भीमही संभ्रमित झाला. कृष्ण हे काय करत आहे?

तत्क्षणी आपल्या बाहूने भीमाच्या स्कंधाला स्पर्शत सहदेवाने त्याला बोलण्याचा संकेत दिला. त्या संकेतानुरूप भीमाने म्हटले, “ महाराज, मी आपणाजवळच आहे. आपण मला आलिंगन देऊ शकता.” भीमाचे शब्द ऐकून धृतराष्ट्राने त्या लोहपुतळ्याला आलिंगन दिले.

त्यानंतर जे काही घडले, ते अपरिमित द्वेष, क्रोध, प्रतिशोधाची तीव्र नि विफल परिणती होती.

धृतराष्ट्राच्या वक्षभागातून रक्त वाहत होते. त्याच्या मुखातून रक्त व जलाची धार लागली होती. त्याचा श्वास- हृदयगती प्रचंड वेगाने चालू होती.

……. आणि तो लोहपुतळा खंडित होऊन भूमीवर पडला होता.

त्या वृद्धाची ती विघातक शक्ती पाहून प्रत्येक पांडव स्तंभित झाला होता. मात्र षड्यंत्री धृतराष्ट्र पांडवांचे प्राणहरण करण्याचा प्रयत्न करेल, असं कुंती, पांचाली नि कृष्णाला वाटले होते.

कृष्णाच्या सावधनतेकारणे हा अपघात नव्हे, विघात टळला होता. पांडवांनी मुक्ततेचा निश्वास टाकला.

धृतराष्ट्राची ती अवस्था पाहून संजयाने त्याला सावरले, " हे विभो, तू स्वस्थ तर आहेस ना? परिचारकहो, राजावर उपचार करा."

संजयच्या सूचनेनुसार तेथे उपस्थित असलेल्या परिचारिकांनी धृतराष्ट्राच्या आघातांवर उपचार केले.

स्वस्थ झालेला धृतराष्ट्र घडलेला प्रसंग व त्यातून उद्भवलेली स्तब्धता, सूचीपतनाइतकी शांतता जाणवून रुदन करण्याचे दंभ करू लागला, " माझ्या बाळा, माझ्या पुत्रा, माझ्या भीमसेना! माझ्या दृढ अलिंगनाकारणे तू मृत्युमुखी पडलास की काय? मला क्षमा कर."

असे म्हणून तो धृतराष्ट्र खोटे अश्रू ढाळीत विलाप करू लागला. ते पाहून प्रत्येक पांडवांच्या- द्रौपदीच्या रक्तात प्रचंड उष्मा निर्माण झाली.

धृतराष्ट्राचा तो असत्य शोक पाहून भीमाने आकस्मिक प्रक्षुब्ध प्रतिक्रिया दिली, " नाही, अंध नरेशा! तुझ्या पुत्रांच्या दुष्ट

इच्छांकारणे अथवा कारस्थानांकारणे या भीमाचा मृत्यू झाला नाही, तर तुझ्या दुर्बल, जर्जर बाहूंनी मला काय होणार होतं? हा भीमसेन महाबली आहे. त्याचे शरीर वज्रासारखे कठोर आहे. त्याला बाहुपाशात घेऊन मृत्यू देणे संभव नव्हे.”

भीमाचे ते शब्द ऐकून धृतराष्ट्राच्या तळपायाची भूमीच सरकली.

“तुझा हा प्रयत्न व्यर्थ ठरला, हे राजा!” कृष्ण पुढे झाला, “ नव्हे, नव्हे! पांडवांना विनष्ट करण्याचे तुझे सर्वच प्रयत्न निरर्थक ठरले आहेत. तू आताही एका लोहपुतळ्याला मोडले आहेस, भीमाला नव्हे.”

“काय?” धृतराष्ट्र विस्मित झाला.

“अर्थातच, हे नरेशा! तू शोक करू नकोस. तुझ्या हातून भीमाचा मृत्यू झालेला नाही. तू प्रतिशोधाने अंध झालेला आहेस, हे जाणूनच मी ही लोहप्रतिमा पुढे केली. पुत्रशोकाने अविवेकी झाल्याकारणे तू ह्या प्रतिमेला भीमच समजून खंडित केलेस. लोहाच्या मोडण्याचा आवाजाला तू भीमाच्या वज्रासारख्या अस्थींच्या मोडण्याचा आवाज समजलास. तुझी ही योजना असफल

ठरली असली, तरी तुझे आचरण उचित नाही. हे राजा!" कृष्णाने शांतपणे तारस्वरात म्हटले. आता त्याचा शब्दांना विशिष्ट धार होती, " तू ज्ञानी आहेस. तूही धर्मशास्त्राचा अभ्यास केला आहेस. हे विभो, तू स्वतःच्या अपराधांची शिक्षा इतरांना देऊन आपले अज्ञान, दुष्टत्व सिद्ध करतो आहेस. तू पूर्वीप्रमाणे आताही मूर्खता करत आहेस. व्यास, विदुरादि विद्वानांनी तुला सूचित केले होते, हे युद्ध घडू देऊ नकोस. तरीही तू आपल्याच सत्तालालसेने आवेगित होऊन दुर्योधनाच्या प्रत्येक दृष्कृत्याला- दुर्वर्तनाला अनुमोदन दिलेस. तुझ्या पुत्रांनी तुझ्याच स्नुषेची भरसभेत विटंबना केली होती, तरी तू आपल्या पुत्रांना रोखले नाहीस. तुझ्या ह्याच पुत्रमोहाकारणे तुझ्या पुत्रांचा नाश झाला. आता मात्र तू भीमाचे प्राणहरण करु पाहतोस?"

कृष्णाच्या परखड शब्दांकारणे धृतराष्ट्र पश्चातापदग्ध झाला, " मला खरोखरच क्षमा कर, पुत्र भीमा! वासुदेवाने जे केले, ते योग्यच केले. अन्यथा मला मृत्यूनंतर नरकातही स्थान मिळाले नसते. परंतु आता माझा क्रोध शमला आहे. त्याकारणे पांडूपुत्रांनी मला आलिंगन देऊन माझे प्रायश्चित पूर्ण करावे."

ते ऐकून भीमादि अन्य पांडवांना क्रोध आला असला तरी, परंपरेप्रमाणे धृतराष्ट्राला आलिंगन देणे आवश्यक होते. परंपरेनुरूप जेता सम्राट पराजित राजाला आलिंगन देऊन त्याला अभय देतो.

म्हणून भीमाने त्याला आलिंगन दिले. त्यानंतर अर्जुनाने त्याचे चरण शिवले.

"पुत्रा, तू कर्णाचा वध केलास, ते उचितच केले. तो कर्णच माझ्या पुत्राला युद्धाच्या भीषण अग्नीत लोटू पाहत होता." असं म्हणून धृतराष्ट्राने धनंजयाला जवळ घेतले.

धृतराष्ट्राचे शब्द ऐकून कुंतीला काहीशी पीडा झाली. या अंध नरेशाने माझ्या कुठल्याच पुत्राचे हित चिंतिले नाही!

नकुल-सहदेवांनीही धृतराष्ट्राला प्रणाम केला.

" माझे माद्रीपुत्र! तुमचे सदैव कल्याण होवो. माझ्या सुकुमार नकुल-सहदेवांना कधीच यातना, पीडा न होवोत."

"हे राजा, तुझ्या पुत्रांनी आम्हाला इतक्या यातना-पीडा दिल्या आहेत, त्यापुढे विश्वातील सर्व पीडा अल्प कष्टदायक आहेत. बालपणी आम्हाला गंगेत कितीदा बुडवणे, आम्ही आसनावर बसलो असतां आम्हाला जाणूनबुजून पाडवणे, आम्हाला आमच्या

माता-पित्यावरून दूषणे देणे, याशिवाय द्यूतसभा, लाक्षागृह व द्वैतवनातील आमचा उपहास करण्याच्या हेतूने गोपरीक्षण असे महापराक्रम होते तुझ्या पुत्रांचे.” नकुलाच्या शब्दांतून जीवनभराचा कौरवांविषयीचा विद्वेष व्यक्त होत होता.

“शांत हो,नकुला! दहन केलेल्या शवांची राख फुंकत स्फुल्लिंगे फुलविण्यात काहीच अर्थ नसतो.” सहदेवाच्या सांत्वनेच्या स्वरातही तीव्र रोष होता.

“माझ्या पुत्रांनो! कृपया असं बोलू नका. या वृद्धाला व त्याच्या पुत्रांना क्षमा करा.” असे म्हणून धृतराष्ट्राने त्यांनाही अलिंगन दिले.

“आता माझ्या प्रियेला- गांधारीलाही वंदन करा. तिच्याशी चार शब्द बोला.” धृतराष्ट्राने गांधारीची शक्ती जाणून पांडवांना उद्देशून म्हटले.

आता प्रत्येक पांडवाच्या हृदयाची स्पंदने अधिकच वेगाने चालली होती. त्यांच्या शरीरातले रुधिराभिसरणही क्षणाक्षणाला गती बदलत होतं. पांडवांच्या मनावर आता अनिश्चितता व भयाची दुधारी तलवार टांगली होती.

मात्र पूर्व- महाराणी आणि आताची राजमाता असलेल्या गांधारीला वंदन करणे हे पांडव- पांचालीचे कर्तव्यच होते.

“माझ्या प्रिय पांडुपुत्रहो! माझा तुमच्यावर मुळीच क्रोध नाही.” आपले अधर दातांखाली दाबत गांधारीने म्हटले, “ मला मान्य आहे, दुर्योधन, कर्ण, अनुज शकुनीच्या अविचाराकारणे हा सर्वनाश घडला आहे. मात्र भीमाने दुर्योधनाचा अन्यायाने वध केला, त्याचा क्रोध माझ्या मनात आहे.”

हे ऐकून भीमाने धैर्य साधले आणि गांधारीचे चरण शिवले.

“राजमाते, तुला क्रोध करण्याचे काहीच कारण नाही. अन्याय करणाऱ्याला मी अन्यायाने उत्तर दिले आहे. अन् यात अनुचित काही नाही. परंतु तुझ्या पुत्राने कधीच धर्माचा विचार केला नाही. द्यूताने आमच्या सर्वस्वाचे अपहरण, द्रौपदीचे वस्त्रहरण अशी पातके केली होती तुझ्या पुत्राने. ती कृत्ये क्षम्य आहेत असे तुला वाटते का? हे सत्य आहे,की मी अन्यायानेच दुर्योधनाचा वध केला. माझी प्रतिज्ञाच तशी होती. तूच सांग मला, आपल्याच कुळातील

कुलवधूला आपल्या मांडीवर विराजमान होण्याचे निमंत्रण देणे कितपत योग्य आहे?"

तिच्या क्रोधाची भीती वाटून भीमाने म्हटले, "तू मला क्षमा कर,माते!"

त्याच्या तोंडून 'माते' हा शब्द ऐकून गांधारी द्रवली, "मी जाणून आहे, माझ्या पुत्राच्या हातून असे दुर्वर्तन घडले आहे. मात्र तू तर एक अत्यंत अमानुष- अमानवी कृत्य केले आहेस. तू दु:शासनाचे रक्त प्राशन केलेस. हे घोर कर्म नरभक्षकांनाच शोभते. हे राक्षसी कर्म अक्षम्य आहे."

"माते, तुला काय वाटलं, मी माझ्या भ्रात्याचे रक्त प्राशन करेन? तुला ज्ञात आहे, ज्याक्षणी दु:शासनाने तिच्या केशांना धरुन अमानुषतेने तिला फरफटत द्यूतसभेत आणलं, त्याचक्षणीच मी ही भयंकर प्रतिज्ञा केली होती. तीच प्रतिज्ञा सत्य ठरवण्याकरिता मी त्याचे रक्त फक्त अधरांना लावले, मी ते प्राशन केले नाही. मी धर्माचे पालन करुनही व कौरवांनी अधर्माचे अनुसरून करुनही तू मलाच दोष का देतेस?"

भीमाचे असत्य शब्द ऐकून अन्य पांडव विस्मित झाले.

भीमाने खरोखरच क्रोधाच्या भरात पाशवीपणे दु:शासनाचे ओंजळभर रक्त प्राशन केले होते व राक्षसी हास्य करुन तो द्रौपदीच्या शिबिरात गेला होता, दु:शासनाच्या रक्ताची दुसरी ओंजळ घेऊन.

द्रौपदीलाही तो प्रसंग स्मरला, ज्यावेळी भीमाने दु:शासनाच्या रक्ताची ओंजळ तिच्या मस्तकावर रिती केली होती. त्या नीच दु:शासनाच्या रक्ताचे बिंदू तिच्या प्रत्येक केशाग्रातून स्पर्शून तिच्या खांद्यावर सांडत होते. त्याच्या रक्ताचा स्पर्श होताच द्रौपदीच्या हृदयातील घृणा, तिरस्कार, उद्वेग आणि अनुक्षोभ पुनः जागृत झाला होता.

भीमाने रक्ताळलेल्याच हातांनी द्रौपदीच्या केशांना रत्नजडित स्वर्णिम साखळयांच्या साहाय्याने बांधले होते, हे सर्व काही द्रौपदीला आठवले व तिचे शरीर कंपित झाले.

"मात्र, पुत्रा!" गांधारीच्या शब्दांकारणे द्रौपदीची विचारतंद्री भंगली, " तू आमच्या एकातरी पुत्राला जिवंत ठेवायला हवं होतंस ना?"

" युयुत्सू जिवित आहे ना?" भीमाने उत्तर दिले.

“माझ्या पुत्रांच्या विनाशाचे कारण असणारा तो धर्मराज युधिष्ठिर कोठे आहे?” गांधारीने क्रोधाने विचारले.

तिचा क्रोध पाहून युधिष्ठिर भीतभीतच पुढे झाला, “देवी, मी तुझा अपराधी आहे. तू मला शाप दे, देवी. शाप दे. तुझ्याकारणे पांडूकुलाचा नाश होऊ दे.”

असं म्हणून युधिष्ठिर गांधारीच्या चरणांशी झुकला.

त्याच्या बोटांचा स्पर्श होताच गांधारीने आपल्या नेत्रांच्या पट्टीच्या फटीतून युधिष्ठिराच्या बोटांकडे पाहिले. तिच्या नेत्रातील तेजामुळे त्याच्या बोटांची शुभ्र- स्वच्छ नखे काळीठिक्कर पडली.

आपल्या नेत्रांतील तेजाचा तो परिणाम पाहून गांधारीने त्या पट्टीची फट रुंदावून खाली पाहून युधिष्ठिराला दग्ध करण्याचा प्रयत्न केला परंतु ते शक्य झाले नाही.

हे काय घडलं? हे पाहण्यासाठी गांधारीने आपल्या पट्टीच्या फटीतून अधिक सूक्ष्मपणे पाहिले. तिला एक श्यामल स्त्री अस्पष्टपणे- अपूर्णपणे दिसली. ती निश्चितच अग्निकन्या पांचाली असावी. तिच्यावरच आपल्या तेजाचा वा आपल्या नेत्रांतील अग्नीचा परिणाम होणार नाही.

आपल्या क्रोधाचा विफल परिणाम पाहून गांधारीने आपली पट्टी नेत्रांवर घट्टपणे बांधली.

हीच संधी साधून युधिष्ठिराचा बाहू खेचून कृष्णाने त्याला बाजूला केले.

गांधारीच्या तेजाचा असा प्रभाव पाहून सर्व युद्धांमध्ये विजयी ठरलेला सव्यासची अर्जुन भयभीत होऊन कृष्णाच्या आड लपला.

"गांधारीने युधिष्ठिराला अथवा पांडवांना भस्मीभूत केले का?" धृतराष्ट्राने न राहवून विचारलेच. त्याचा स्वभाव- मूळ प्रवृत्ती पुनः उद्भवलीच.

"नाही, महाराज! मला ते शक्य झाले नाही." गांधारीने निराशेने म्हटले.

ते ऐकून धृतराष्ट्रही हताश झाला. मात्र त्याने विषयांतर केले, "आपल्याला मृतकांचे अंत्यसंस्कार करायचे आहेत ना. चल संजया, मला धरून ने."

"संजया, तू महाराजांस त्यांच्या मृत पुत्रांच्या प्रेतापाशी ने आणि सविते, तू राजमाता गांधारीला त्यांच्या पौत्रांच्या प्रेताकडे ने." पांडवांनी संजय व सवितेला आज्ञा दिली.

“चल, द्रौपदी, आम्हाला आपल्या पुत्रांपाशी घेऊन चल. ज्या ध्वस्त शिबिरात आपल्या ज्येष्ठ पुत्रांचे-द्रौपदेयांचे मृतदेह आहेत.” युधिष्ठिर दुःखाने म्हणाला.

आता द्रौपदीलाही पुत्रशोक आवरत नव्हता. तिचा संयम संपला होता. तिला पुनः त्याच शिबिरात जायचे होते.

अन् तिचे पतीही तिच्याइतकेच दुःखी होते !

द्रौपदी पांडवांना त्या शिबिरापर्यंत घेऊन आली. तिला आठवलं, हे महायुद्ध जिंकल्यानंतरची विजयोत्सवाची ती रात्र. तेव्हा नकुल तिला याच शिबिरात न्यायला आला होता. तेव्हाही या ध्वस्त व जळत्या शिबिरात तिला यावं लागलं होतं.

“आर्यपुत्रहो! हे माझे पुत्र पाहा. मी त्यांच्या सहवासात अत्यंत अत्यल्प जीवनकाल व्यतीत केला होता. आपल्या ममतेचा त्यांच्यावर वर्षाव करण्याकरिता मला पुरेसा काळ मिळालाही नाही. वनवास- अज्ञातवासाच्या काळात मी त्यांच्यापासून दूर राहिले. मी माझ्या पुत्राची माता असूनही मातृकर्तव्य निभावू शकले नाही. आणि माझ्या पुत्रांनी मात्र आपल्या कर्तव्याचे निर्वाहन केले. माझ्या

सौभाग्याचे रक्षण करण्यासाठी स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले." असे म्हणून द्रौपदी रुदन करू लागली.

तिचा आक्रोश व आपल्या पुत्रांची शवे पाहून पांडवाचे नेत्रही सजल झाले.

"द्रौपदी, स्वतःला सावर." भीमसेन आपल्या नेत्रांतील अश्रू पुसत म्हणाला, " पांचाली, तू जर त्या दिवशीप्रमाणे मूर्च्छित झालीस, तर त्या दिवशीप्रमाणे आमचीही शुद्ध हरपेल. तुला शोकमग्न पाहून आमचे धैर्य नष्ट होईल. "

"मी स्वतःचे धैर्य साधेनही, आर्यपुत्र! एकच प्रश्न माझ्या मनाला त्रस्त करत असतो, या सगळ्यांत माझ्या पुत्रांचा काय दोष होता, काय अपराध होता? की त्यांची इतक्या निर्घुणतेने हत्या झाली? माझे पुत्रही सुकुमार होते. तेच माझ्या पतीनंतर या राज्यावर सत्ता करणार होते. स्वतःच्या पराक्रमाने पांडवाप्रमाणेच दिग्विजय करणार होते. इतक्या दुःखद कालावधीनंतर मला व माझ्या पुत्रांना आनंदाचे काही क्षण मिळणार होते, तेही नियतीला पाहवले गेले नाही?'' द्रौपदीच्या नेत्रांतून अविरत अश्रू वाहत होते, " पांडुपुत्रहो! प्रत्येक मनुष्याची इच्छा अशी असते की, आपल्या मृत्यूनंतर

आपल्या पुत्रांनी आपल्याला अग्नी द्यावा. परंतु येथे तर उलटच घडते आहे."

द्रौपदी अशा प्रकारे शोक करत आपल्या पुत्रांच्या रक्तश्लांछित देहांना आलिंगन देत होती.

तिला रूदन करताना पाहून सुभद्रेला, कुंतीलाही आपले दुःख अनावर झाले.

द्रौपदीच्या पुत्रांच्या शवाजवळच असलेल्या मृत अभिमन्यूचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन सुभद्राही शोक करू लागली, "पुत्रा, इतक्या कोवळया वयात आम्हाला, तुझ्या पत्नीला, तुझ्या भावी बालकाला सोडून जाण्याची काय आवश्यकता होती रे? मला, भगिनी पांचालीला व उत्तरेला तुझाच आधार होता रे."

सुभद्रेचे अश्रुमोचन पाहून पांडव चिंतित झाले. स्वतःला पुत्रशोकातून सावरुन आपल्या स्त्रियांचे कसे सांत्वन करावे? हे त्यांना कळेना.

"माझाही ज्येष्ठ पुत्र- वसुषेण किती विपत्तीमय, दुःखमय- अवमानित परिस्थितीत जगला होता ! मी त्याचा परित्याग केला नसता तर, आयुष्यभर 'सूतपुत्र' हे लांछन त्याला लागले नसते." असं म्हणून कुंतीनेही आपले दुःख व्यक्त केले.

"माझा पुत्र अभिमन्युही स्वतःच्या प्राणांवर विपत्ती असूनही त्या चक्रव्यूहात प्रवेशला अन् त्या योध्द्यांच्या समूहाने त्याची एकत्रितपणे हत्या केली." रुदन करता- करता पांचालीनेही अर्जुनाला दोष दिला, "आर्यपुत्र अर्जुन, तुम्हाला स्वतःच्या पुत्राची चिंताच नव्हती. आपण संशप्तकांशी युध्द करण्यात का व्यस्त झालात? तुम्ही आपल्या पुत्राचे रक्षण करायला हवे होते ना!"

द्रौपदीचे ते दोषारोप ऐकून अर्जुन अभिमन्यूच्या प्रेतावर अश्रू ढाळू लागला, " तू अगदी सत्य बोललीस, कृष्णे! अभिमन्यू व द्रौपदेयांच्या मृत्यूचे कारण आम्ही सर्व पांडवच आहोत. जर आम्ही आमच्या पुत्रांचे रक्षण केले असते, आम्ही सदैव त्यांच्यासह असतो, तर आपल्याच नेत्रांनी आपल्या पुत्रांचे मृतदेह पाहण्याची ही वेळ आलीच नसती."

"कल्याणी, सुभद्रे, मातुश्री! पुरोहित व चाण्डाल आले आहेत. आपण सर्वांनी आपल्या प्रियजनांचे दहन केले पाहिजे." युधिष्ठिर राहुटीच्या गवाक्षात डोकावत म्हणाला.

"सेवकहो! आमच्या पुत्रांचे देह स्मशानात न्या. आम्हीही या शोकयात्रेत सहभागी होणार आहोत." भीमसेनाने स्वतःला

भावनावेगातून सावरत म्हटले, “पांचाली,चल उठ.” त्याने पांचालीचा हात धरून तिला उठवले.

अर्जुनानेही आपल्या बलशाली बाहूंनी सुभद्रेला आधार देत तिला उठविले.

कुंतीला आधार देण्यासाठी युधिष्ठीराने तिचा हात देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा कुंतीने त्याचा हात झिडकारत नकुल-सहदेवांचे हात धरले.

आपल्या स्त्रियांना व मातेला आधार देत पांडव त्यांना स्मशानात घेऊन आले. त्यांनी एक वेगळेच दृश्य पाहिले, पांडवांना या युद्धाचे, या विनाशाचे कारण मानणारी गांधारी आपल्या पुत्रांच्या प्रेतांना जवळ घेऊन म्हणत होती, “माझ्यामुळेच ह्या श्रेष्ठ कुलाचा विनाश झाला.”

पांडवांनी विचार केला, गांधारीची स्थिती शोकमग्न आहे, म्हणून ती स्वतःला दोष देत आहे. तिच्या त्या दुःखाचा उपशम झाल्यानंतर ती आपल्यालाच दोष देईल.

पांडवांनी तिच्याकडे दुर्लक्ष करत आपल्या पुत्रांच्या प्रेतांना चंदनी काष्ठांच्या चितांवर ठेवले. पांडवाच्या भार्या अद्यापही रुदन करीत होत्या.

तत्क्षणीच पांचाल सैनिकांनी धृष्टद्युम्न- शिखण्डीची प्रेतेही पांडवाच्या पुत्रांच्या शवांजवळ ठेवली.

आपल्या भ्रात्यांची खंडित झालेली शवे पाहून पांचालीने अधिकच शोक आरंभित केला. त्या सर्वांचे रुदन ऐकून धृतराष्ट्र- गांधारीला काहीसं समाधान वाटलं. आपल्या पुत्रांचा संहार करणारे पांडव कसे शोकमग्न आहेत, त्यांचे रुदनस्वर ऐकून त्या पुत्रशोकाने दुःखी दाम्पत्याच्या मनाला संतोष मिळाला.

गांधारी आपल्या पुत्रांच्या प्रेतांजवळून उठली आणि कुंती- द्रौपदीकडे जाऊन तिने म्हटले, "कुंती, द्रौपदी! तुम्ही शोक करू नका. युध्दाकारणे आपले प्रियजन मृत्युमुखी पडले, तर असं समजा की आपल्या परिवारजनांना वीरगती प्राप्त झाली आहे." तिचे शब्द त्या दोघींच्या जिव्हारी लागले.

"उचित म्हणालीस, गांधारी!" कुंती तिरकस शब्दात म्हणाली, "फक्त आमचेच प्रियजन वीरगतिस प्राप्त झाले आहेत. तुझ्या प्रिय पुत्रांचा मात्र संहार झाला आहे, तेही अमानुषपणे!"

त्या दोघां यातांचा तर्क- वितर्क ऐकून पांडवांना क्रोध आला.

"मातुश्री व राजमाते! हा समय तर्क-वितर्क करण्याचा नव्हे. आपण संयतपणे आपल्या प्रियजनांना जलांजली दिली पाहिजे,

अन्यथा त्यांच्या आत्म्यांना शांती कशी मिळणार?" युधिष्ठिराने म्हटले. तसे सर्वजण शांतपणे त्या चितांसमोर उभे होते.

जेते सम्राट व समाज्ञी या नात्याने पांडव- द्रौपदी आपलं दुःख आवरून प्रत्येक प्रेताला अंशतः अग्नि, तिलांजली देत होते.

प्रत्येक मृताचं आपल्या दृष्टिकोन- अनुभवाच्या आधारे पांडव-पांचाली वर्णन करून आपली क्रोधभावना, दुःख आणि वैषम्य व्यक्त करत होते.

"हा आपला प्रिय पुत्र घटोत्कच, ज्याने मृत्यूच्या क्षणीही आपल्या प्रचंड देहाने कौरवसैन्याला चिरडून पांडवांचं कार्य सुलभ केलं होतं." द्रौपदीचे हे शब्द ऐकून भीमाने आपल्या पुत्राच्या देहाला पूर्णतः अग्नी देत म्हटले, "मी उचित केलं, जे मी हिडिंबेला उत्तरेसह शिबिरात थांबण्याची आज्ञा दिली. अन्यथा तिलाही दुःख आवरलं नसतं, आपल्या पुत्राचं शव पाहून."

त्यानंतर अभिमन्यूसह अन्य पुत्रांना अग्नि देताना व जलांजली देताना पांडव-पांचालीला अश्रू अनावर झाले होते. मात्र त्यांनी स्वतःला संयत केले.

"माझ्या पुत्रांनो, माझ्या ज्येष्ठ पुत्राला-कर्णालाही अग्नि द्या." कुंतीने आपल्या पाचही पुत्रांना आज्ञा दिली.

तिच्या आज्ञेचे पालन करत पांडव त्यांच्या ज्येष्ठ भार्येसह दूरवर रचलेल्या कर्णाच्या चितेपाशी गेले. त्या चितेजवळ वृषाली वृषकेतुसह उभी होती. तिने त्याच्या हातात अग्निपात्र दिले व कर्णाच्या चितेला अग्नि देण्याचा संकेत केला.

आपल्या पित्याला अग्नि देताना वृषकेतुचा हात थरथरत होता.

त्याचक्षणीच अर्जुनाने त्याच्या कंपित हातातून ते अग्निपात्र घेतले.

“मी कर्णाचा वध केला आहे, त्याकारणे मीच त्याला अग्नी देऊन जलांजली देईन.” अर्जुन गतनिश्चयाने म्हणाला.

“तू माझ्या पतीचा शत्रू होतास. त्याकारणे मी तुला माझ्या पतीचे अंत्यसंस्कार कदापि करू देणार नाही, अर्जुना!” वृषालीने अर्जुनाच्या हातातून अग्निपात्र हिसकावून घेतले.

“मात्र मी विजयी सम्राट आहे अन् कल्याणी ही सम्राज्ञी आहे. त्याकारणें मीच सपत्नीक कर्णाला अग्नि व जलांजली देईन.” युधिष्ठिराने म्हटले.

“नाही, धर्मराज! आपणही नाही.” वृषालीने नकार दिला.

“का? मी माझ्याच भ्रात्याला अग्नि व जलांजली दिली तर, तुला कसली आपत्ती आहे ?अंगराज्ञी!” युधिष्ठिराने म्हटले, “मी कर्णाच्या नखाला धक्काही लावला नव्हता, तरीही?”

“धर्मराज! आपण अर्हनिश- अहोरात्र माझ्या पतीच्या मृत्युचे चिंतन करत असत. म्हणून आपण माझ्या पतीचे अंतिम संस्कार करू शकत नाही!”

“अंगराज्ञी, प्रत्येक निर्णय भावनेत वाहून घेणे उचित नसते. कर्णपुत्र वृषकेतु किती भयग्रस्त झाला आहे, त्याच्या हातून कर्णाला अग्नी देणे अयुक्त आहे.” सहदेवाचे शब्द वृषालीला पटले. तिने म्हटले, “मला सहदेवाचे शब्द मान्य आहेत. म्हणून मी माझ्या पतीचे दहन करण्याचा अधिकार फक्त माद्रेयांना देत आहे.”

“तर आम्ही सर्व पांडव हा अधिकार एकत्रितपणे ग्रहण करत आहोत.” असे म्हणून युधिष्ठिराने ते अग्निपात्र हातात घेतले. तसं त्या पात्राला अन्य पांडवांनी- द्रौपदीनेही धरले आणि एकत्रितपणे कर्णाला अग्नी दिला.

कर्णाच्या चिताग्नीवर स्वतःचा क्रोध, वैषम्य व त्यांच्याविषयी घृणा- विद्वेष अर्पण करत द्रौपदीने म्हटले, “हा कर्ण पूर्वजन्मीच्या

पुण्यकर्मामुळे राजमाता कुंतीच्या पोटी जन्मला आला असावा. मात्र पूर्वीच्या संचिताकारणे तो कानीन पुत्र झाला. तरीही मी त्याला याच कारणामुळे अग्नी देत आहे की तो कौंतेय आहे. नाहीतर मी त्याच्या प्रेताकडे पाहिलेही नसते. याच नीचाने माझ्या चारित्र्याविषयी वीभत्स शब्द उच्चारून जर दु:शासनाला वस्त्रहरणाला उद्युक्त केले नसते, तर दुर्योधनाने ते दुष्कृत्य करण्याची दु:शासनाला आज्ञा दिली नसती.”

“यानेच माझ्याशी निष्कारण स्पर्धा केली तसेच वैर धरले, म्हणून आताही माझे मन हे स्वीकारायला सज्ज होत नाही की कर्ण हा माझा कानीन भ्राता आहे.” अर्जुनाने कर्णाच्या मुखात जल-तुळशीपत्र ठेवत म्हटले.

आपल्या मनातील सर्व भावना- क्रोध,उद्वेग वगैरे कर्णावर काढून झाल्यानंतर पांडवानी वृषकेतुला जवळ घेतले.

“वृषकेतुचे संगोपन करण्याचे दायित्व आमचे.” युधिष्ठीराने त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले होते. “आम्ही कर्णपुत्र वृषकेतूचे अत्यंत प्रेमाने संगोपन करू.”

“मी विधवा आहे, असहाय्य वा निष्कांचन नव्हे. मी भावी अंगराजाचे पालन-पोषण करण्यासाठी सक्षम आहे. कारण मी वृषकेतूची माता व अंगदेशाची सम्राज्ञी आहे.” वृषालीने स्वाभिमानाने म्हटले. शेवटी तिच्याही अंगात क्षत्रियांचेच रक्त होते!

“जशी तुझी इच्छा.” युधिष्ठिराने म्हटले. तिला हस्तिनापुरात निवास करण्याचा आग्रह करणे त्यालाही उचित वाटले नाही.

“मी सूतकाचे विधी पूर्ण झाल्यानंतर अंगदेशास प्रस्थान करेन.” असं म्हणून वृषालीनेही कर्णाला जलांजली दिली. वृषकेतुनेही तिचंच अनुकरण केलं.

“आता आपल्या सर्वांना दुर्योधन, दु:शासनाच्या प्रेतांना अंशतः अग्नि द्यायचा आहे.” युधिष्ठिराने विषयपरिवर्तन केले, “ उर्वरित विधी युयुत्सु पूर्ण करेल.” युधिष्ठिराचे शब्द ऐकून अन्य पांडवांना क्रोध आला नि पांचालीच्या मनाला आत्यंतिक पीडा झाली.

तिच्या हृदयाला पीडा का होणार नाही? ज्या दुष्टांनी तिची विटंबना केली होती. ज्यांतील त्या ज्येष्ठ कौरवाने तिच्याकडे पाहत

मांडी थोपाटून असभ्य संकेत केले होते, "द्रौपदी, ये, माझ्या मांडीवर बस आणि माझा सहर्ष स्वीकार कर."

अन् तो दु:शासन······.. त्याने तिच्याशी जे दुर्वर्तन केले होते, ते स्मरण करणेही संभव नव्हतं.

आता त्या उभयतांच्या प्रेताला अग्नि देऊन त्यांना जलांजली द्यायची म्हणजे·········.

पांचालीने एक निश्वास टाकला. मृत्यूनंतरही शत्रुत्वाचा अंत होतो हे पूर्णत: सत्य नव्हे अथवा शत्रूविषयीच्या घृणेचा, त्याने केलेल्या अवमानाच्या पीडादायक स्मृतींचाही सहजासहजी विसर पडत नाही.

तिने मस्तक हलवून आपले विचार संयत करण्याचा प्रयत्न केला. काही अंशी ती शांत झाली.

तिने पांडवांसमवेत दुर्योधनाला अंशतः अग्नि दिला, त्यानंतर हात खंडित झालेल्या नि वक्ष छिन्नविच्छिन्न झालेल्या दु:शासनाच्या देहालाही.

कौरव स्त्रियांचेही शोकस्वर मागून ऐकू येत होते. लक्ष्मणादेखील रूदन करत होती. सुभद्रा तिला सावरत होती.

ज्येष्ठ गांधारीपुत्रांना अग्नि दिल्यानंतर पांडव शल्याच्या प्रेताजवळ गेले. त्या प्रेताजवळ शल्याच्या कनिष्ठ भ्राता- अरुण,शल्याची पत्नी आणि शल्याची कन्या- सहदेवाची भार्या- विजया बसून अश्रू ढाळीत होते.

सहदेवाने क्षणांचाही विलंब न करता विजयेच्या नेत्रांतील अश्रू पुसले. तिला जवळ घेत त्याने म्हटले," प्रिये, दुःख करू नकोस. कौरवांच्या या अंतिम सेनापतीला वीरगती प्राप्त झाली आहे." सहदेवाने सांत्वनार्थ असे म्हटले खरे, मात्र त्याच्या स्वरात एका प्रकारचे अलिप्तपण व निरलसता होती.

"अन्यथा ह्या मद्राधिपती शल्याचे आमच्याशी कुठले नाते आहे? राजसूय यज्ञापर्यंत या शल्याला माहितही नव्हते की, आपल्याला कोणी नकुल-सहदेव नावाचे भागिनेय आहेत. आपल्याला माद्री नामक भगिनी होती. जेव्हा राजसुय यज्ञाकरिता करभार घेण्याकरिता सहदेव मद्रदेशात गेला, तेव्हा तर या शल्याने अगणित धनासह आपली कन्याही त्याला दिली. त्यानंतर आमच्या पक्षात सदैव राहून आम्हाला समर्थन देण्याचे वचन दिले होते, मात्र

युद्धघोषणेवेळी त्याचा स्वार्थ दिसून आला. दुर्योधनाने काय उत्तम स्वर्णिम वस्तूंनी स्वागत केले, तर स्वतः अज्ञ असण्याचे दंभ करत मातृल शल्याने त्याला वचनही दिले.” नकुलाच्या नासिकांतून क्रोधाकारणे उष्ण उच्छवास बाहेर पडत होते. सहदेव त्याच्या खांद्यावर हात ठेवीत त्याला शांत करण्याचा प्रयत्न करत होता.

“नकुला, शांत हो, हा आपल्या मातेचा भ्राता आहे. या युद्धात त्याने आपल्याला सहाय्यही केले आहे. कर्णाचा सारथी असताना मातृल शल्याने त्याच्या आत्मविश्वासाचे वारंवार खंडन करून कर्णाच्या धनुर्विद्येचा- त्याच्या शस्त्रकुशलतेचा वारंवार ऱ्हास घडवून आणला आहे.” सहदेवाचे शब्द ऐकून नकुलाचा क्रोध शमला. किंतु इतका वेळ शांत बसणारी विजया संतापाने उसळली. ती सहदेवाला म्हणाली, “मी श्रुत आहे की, आपले ज्येष्ठ भ्राते आपल्याविषयी सापत्नभाव बाळगत नाहीत, परंतु हे असत्य आहे. त्यांच्या मनात तुमच्याविषयी व तुमच्या मातृलाविषयी सापत्नभाव नसता, तर त्यांनी माझ्या पित्याच्या प्राणच घेतला नसता.”

“हा प्रत्यारोपच निरर्थक आहे.” इतका वेळ भावनाविवश असलेला युधिष्ठिर व्यवहारिकतेने तर्क करीत म्हणाला, “विजये! आमच्या मनात शल्याविषयी सापत्नभाव नव्हता, याउलट

त्याच्याच मनात माझ्याविषयी सापत्नभाव होता. जर त्याने फक्त स्वागताच्या सुसज्जतेकडे पाहून दुर्योधनाला वचन दिले नसते तर, मीही त्याचा वध केलाच नसता.”

“तात्पर्य?” विजयेने आपल्या वस्त्राच्या पदराने आपले अश्रू पुसले.

“तात्पर्य हेच, की तुझ्या पित्याने कौरवांच्या पक्षात युध्द केले म्हणून मी त्याचा वध केला.” युधिष्ठिराचा तर्क अत्यंत साधारण होता.

“विजये, चल उठ. आपल्या सर्वांना मातृल शल्याला अग्नि देऊन तिलांजली द्यायची आहे, तेव्हा आपण आपले दुःख बाजूला सारून आपल्या मातृलाचे दहन केले पाहिजे.” सहदेवाने तिच्या स्कंधाला धरुन तिला उठवले.

मात्र विजया काष्ठवत् उभी होती. तिला आपल्या पित्याच्या व पुत्राच्या- सुहोत्राच्या मृत्यूचे दुःख सहन होत नव्हते. किशोरी होत्रवाहिनी- जर या स्मशानात-अशा प्रेतांच्या खचांत आली असती, तर ती मूर्च्छित झाली असती.

या विचारानेच सहदेवाचे हृदय भयव्याकुळ झाले.

"आपण सर्वांनी शल्याला अग्नि दिला पाहिजे." युधिष्ठिराच्या शब्दांनी सहदेवाची तंद्री भंगली, "अवश्य······"

काही क्षणानंतर पांडवांनी सपत्नीक शल्याला अग्नि दिला. शल्याची चिता ज्वलित झाली. त्या चितेवरुन लवलवत्या त्या ज्वाला आकाशाकडे झेपावत होत्या आणि वर-वर जात होत्या.

पांडवांना मृत्युनंतरच्या जीवनाविषयी श्रुतींचे स्मरण झाले, ज्यामध्ये असे सांगितले होते की जेव्हा दहनानंतर ज्वाळा लवलवत आकाशाकडे झेपावतात, तेव्हा मृतांचा आत्मा स्वर्गात गमन करत आहे, असे समजावे.

पांडवांना ज्ञात होते, परमेश्वराने राजा कुरुला दिलेल्या वरदानानुरुप या कुरुक्षेत्री धारातीर्थी पडलेला योध्दा थेट स्वर्गात प्रयाण करतो, तर तो दुष्ट दुर्योधन असला तरी, अथवा तो नीच दु:शासन असला तरी.

तत्क्षणी त्यांना श्वेत वस्त्रे धारण केलेल्या स्त्रिया स्मशानात येताना दिसल्या. त्या स्त्रिया सैनिकांच्या विधवा भार्या होत्या.

पांडुपुत्रांना अजूनही सैनिकांच्या स्त्रियांचं सांत्वन करायचं होतं.

# ७७

“द्रौपदी, अर्जुन व सहदेव! तुम्ही तिघांनी स्मशानात जाऊन प्रेतांची अंदाजे गणना करुन सांगा, किती सैनिकांचे मृत्यू झालेत, किती जखमी आहेत.” युधिष्ठिराने सैनिक प्रेतगणनेचे कार्य गणनकुशल सहदेव, विचारी पांचाली व दत्तचित्त अर्जुनावर सोपवले .

“जशी आज्ञा,आर्य! आपण तिघेही या स्मशानाच्या प्रवेशपथी थांबा.”

“भाताश्री! आपण त्या स्त्रियांना काही वेळेनेच घेऊन यावे. तोपर्यंत किती सैनिक धारातीर्थी पडले आहेत, याचं संज्ञान प्राप्त करु. हे सर्व जाणून घेणे हे एका जेत्या सम्राटाचे कर्तव्य आहे. त्यानुरूप त्या स्त्रियांना व अनाथ पुत्रांना- बालकांना आवश्यक असणाऱ्या वस्तूंची- वस्त्रप्रावरणे, अन्न-जल, आरोग्य-शिक्षणाकरिता औषधे-पत्रीय सामुग्रीची तजवीज करता येईल.” सहदेवाने म्हटले.

"आणि ह्या सामुग्रीची व्यवस्था फक्त द्वारकाधीश कृष्ण व पांचाल देशाचे महामात्य चैत्र्यशुभ्रक करु शकतील." अर्जुनाने म्हटले.

"अवश्य!" युधिष्ठिराने जेत्या सम्राटाच्या शैलीत म्हटले.

त्यांची संमती प्राप्त होताच अर्जुन, द्रौपदी व सहदेव स्मशानात गेले. अन् अर्जुनाने सामान्य गणनपध्दतीनुसार त्या प्रेतांची गणना करण्यास आरंभ केला. तेव्हा त्या तिघांच्या लक्षात आले, की ह्या साधारण सैनिकांच्या शवांची गणना करणे असंभव आहे.

कारण सर्वत्र प्रेतांचा खच पडला होता. रक्त व मांसाचे तुकडे जागोजागी सांडलेले होते. काही सैनिकांच्या शरीरांचा तर लोळागोळा झाला होता. काहीजणांच्या शरीरांचे गिधाडांनी लचके तोडले होते. काही सैनिकांचे देह तर अश्वांच्या टापांखाली, रथांच्या चक्राखाली दबून भरडले होते. याखेरीज कित्येकांचे अवयव विलगित होऊन वेगवेगळया ठिकाणी पडले होते. आग्नेयास्त्राकारणे कित्येक सैनिकांच्या शवांची राख झाली होती.

अशा परिस्थितीमुळे सैनिकांच्या प्रेतांचे गणन शक्य नव्हते. त्याकारणे सहदेवाने आपले नेत्र मिटले-उघडले- पुन्हा नेत्र मिटत म्हटले,"कदाचित ही संख्या अब्जावधीहून अधिक असू शकते."

“सैनिकांची? की सैनिकांच्या शवांची?” अर्जुन संभ्रमाने विचारले.

“सैनिकांच्या शवांची संख्या मीदेखील सांगू शकत नाही. मात्र सैनिकांची विशिष्ट संख्या अब्ज- कदाचित खर्वापर्यंत असू शकते.” सहदेवाच्या शब्दांकारणे द्रौपदी स्तिमित झाली, “तात्पर्य?”

“यातील काही सैनिक घायाळ झाल्याकारणे वैद्यांकडे उपचार घेत असतील, काही सैनिक अधिक जखंमाकारणे अचेतन झाले आहेत. काही सैनिकांना अश्वाच्या टापांनी फरफटत युध्दक्षेत्रापासून दूरवर नेले आहे. काही सैनिकांनी कधीच पलायन केले होते. आणि या सर्व सैनिकांतील सर्वाधिक सैनिकांचा थांगपत्ताच नाही की ते सध्या कोठे आहेत?” सहदेवाने उत्तर दिले.

“तर आपण सांगितलेली सर्व उपयुक्त सामुग्री किती प्रमाणात द्वारकेकडून वा पांचालाकडून मागवून घ्यायची?” अर्जुनाने म्हटले.

“कदाचित मणिपुराहूनही सामुग्री मागवावी लागेल.” सहदेवाने म्हटले.

“आपण मणिपुरातून सैन्य अथवा युध्दाकरिता साहाय्य घेतले नाही,तर युध्दानंतर ती उपयुक्त सामुग्री का मागवून घेऊ?” अर्जुनाचा स्वर स्वाभिमानिक होता.

“इंद्रप्रस्थातून ही सामुग्री मागवावी?” पांचालीचा प्रश्न.

“नाही, ती सामुग्री राखून ठेवली पाहिजे.” सहदेवाचा स्वर चिंतित होता.

यावर काही क्षण तिघेही निःशब्द राहिले.

“राजकुमार सहदेव!” अकस्मात सेवकाने त्या तिघांना सूचना दिली, “सर्व सैनिकांच्या विधवा स्त्रिया स्मशानात प्रवेशताहेत.”

“एवमस्तु.” असं म्हणत सहदेवाने त्या स्त्रियांना स्मशानात येण्याची अनुमती दिली. तत्क्षणी त्याला, अर्जुनाला व पांचालीला दिसले की, कौरवस्त्रिया आपल्या प्रियजणांच्या प्रेतांना कवटाळून शोक करत असल्यामुळे त्यांच्या वस्त्रांना रक्ताचे डाग पडले होते, कल्याणीच्या शापानुरुप.

ते दृश्य पाहून पांचालीला पुनः तो प्रसंग आठवला, ज्याक्षणी पांचाली रज:स्वला होती व तिच्या वस्त्रांवर पडलेले शोणिताचे डाग पाहून कौरव विकृतपणे हसत होते.

ते सर्व स्मरून पांचालीच्या शरीरावर रोमांच उभे राहिले, तसेच तिचा क्रोध पुनः जागृत झाला.

जसं कौरवांचं कुत्सित हास्य कर्णपटलावर आदळू लागलं, तशी ती अर्जुनाचा केयूर धरत म्हणाली, “आर्य, मी काही क्षणांसाठी धर्मराजांकडे जाते. कारण सैनिकांच्या स्त्रियांनी त्यांना प्रश्न विचारून विचारून भंडावून सोडवलं असेल.”

“अवश्य······” अर्जुनाच्या शब्दांकारणे पांचालीला पुन्हा धैर्य प्राप्त झाले व सैनिकस्त्रियांच्या त्या प्रश्नांमुळे युधिष्ठिर पुनः मनोमन खचून जाऊ नये म्हणून त्याला आधार देण्याकरिता ती युधिष्ठिराकडे गेली.

युधिष्ठिर एका उच्च आसनावर उभा राहून त्या विधवांच्या प्रश्नांना तोंड देत होता. परंतु त्या शोकोत्तेजित स्त्रियांना समजावणं त्याला कठीण जात होतं. त्या विलाप करत पांडवांना शाप देत होत्या.

“अतिउत्तम! राजा युधिष्ठिरा! तुझ्या राज्यात योध्दांना सत्कृत केले जाई. परंतु इथे तर आमच्या पतींची शवे देखील आम्हाला प्राप्त होत नाही. हे नरेशा, कारण आमच्या पतींच्या शवांना तुम्ही

छिन्नविच्छिन्न केले ना,अथवा तुमच्या शस्त्रांनी त्यांच्या शवांना नामशेष केले आहे ना?”

“तुम्हा सर्व पांडवांचा सर्वनाश होऊ दे! तुमच्या जीवनातील सर्व सुख नष्ट होवोत! तुमच्या मनाला स्वस्थता कधीच मिळणार नाही, उर्वरित आयुष्यात तुम्हाला शांती लागणार नाही. तुमचाही परिवार या युद्धात भस्मीभूत झाला, हा दैवाने तुम्हाला दिलेला पाठच आहे, म्हणावा. तुम्हालाही कळेल, ज्याचा परिवारच नष्ट झालेला असतो, तो किती एकाकीपणे जगतो!” त्या स्त्रियांचे शाप तेथेच येऊ पाहणाऱ्या अन्य पांडवांनी ते भयानक शब्द ऐकले अन् त्यांचा उरलासुरला धीर नष्ट झाला. त्यांनी आपल्या कानांवर हातच ठेवले, ते शब्द असह्य होऊन.

युधिष्ठिराचे तर अवसान गळले व द्रौपदीच्या मस्तकावर वज्राघात झाला.

द्रौपदीला तेथे आलेले पाहून त्या विधवा स्त्रियांना अधिक उत्तेजन प्राप्त झाले. त्या सर्व स्त्रिया शेपटावर पाय पडलेल्या नागिणीगत फुत्कार लागल्या, “हीच अग्निशिखा या सर्वनाशाला कारणीभूत आहे. हिच्या मुक्त केशांनी आर्यवर्ताच्या क्षत्रियांना आपल्या पाशात आवळून त्यांचा विध्वंस केला आहे. या

पांचालराजकुमारी पांचालीने जर असा भयंकर अभिशाप दिला नसता, तर या आर्यवर्तात आज विधवांचे बाहुल्य नसतेच.”

असं म्हणून झाल्यानंतर त्या विधवांनी औदास्याने म्हटले, “आता आम्ही आत्मघात करणार! आम्हा विधवांकडे आत्महत्येवाचून अन्य कुठला पर्याय नाही. या नगरीत उरलेले पुरुष आमच्या सन्मानावर घाला घालू शकतात. ते आमचा सन्मान मलीन करण्यापूर्वी आम्ही प्राण देणार!”

त्यांचा हा निकराचा निर्णय ऐकून चारही पांडवांना व द्रौपदीला प्रचंड धक्का बसला. जर त्या स्त्रियांनी आत्महत्या केली तर, पांडवांच्या राज्यपालनाच्या पूर्व कीर्तीवर कलंक लागेल तसेच त्या स्त्रियांचे पुत्र अनाथ होतील.

द्रौपदीने स्वतःला सावरले आणि आत्मघाताकरीता प्रवृत्त झालेल्या त्या स्त्रियांना कठोर स्वरात सूचित केले, “हे सैनिकांच्या स्त्रियांहो! तुम्हांला मी तुमच्या सन्मानाच्या सुरक्षेची खात्री देते. तुमच्या सन्मानाला स्पर्श करू पाहणाऱ्या पुरुषाला स्पर्श करण्यापुर्वी दंडित करण्यात येईल. परंतु तुम्ही सर्वजणी आत्महत्या करू शकत नाही.”

“हे द्रुपदराजनंदिनी! आमच्या अधिकारांना का हिरावून घेतेस? प्रत्येक पतिनिष्ठ स्त्रीचा हा अधिकार असतो, तिने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर प्राणत्याग करावा की नाही? तुम्ही सर्व पांडव आमच्या अधिकारांचे हनन का करताहात?” त्या स्त्रिया दुखावल्या स्वरात म्हणाल्या.

“मी मान्य करते, तुमचा परिवार नष्ट झाला आहे. पूर्णतः नव्हे. कारण तुम्हा सर्वांच्या पदरात तुमची लहान- लहान बालके आहेत, हे तुम्ही विसरताहात, असा कठोर निर्णय घेताना. मी तुम्हां सर्वाप्रमाणे माझ्या पित्याला -भ्रात्यांना गमावले आहे. माझ्याप्रमाणे तुमच्या वंशाचा नाश झालेला नाही. तुमचे पुत्र- कन्या अजूनही जिवंत आहेत. त्यांच्यासाठी तरी तुम्ही सर्वजणींनी स्वतःच्या जीवनाचे रक्षण करावे.” आपल्या स्वरातील कठोरता घटवून पांचालीने म्हटले.

तिचे शब्द ऐकून त्या सर्व स्त्रियांच्या मस्तकावर आरूढ झालेले उत्तेजन काही प्रमाणात उतरले. त्यांची कठोर झालेली मने द्रवली. त्यांना त्यांच्या पुत्रांचे स्मरण घडले. जर त्यांनी प्राण दिले असते, तर त्यांची अपत्ये उघड्यावरच पडले असती. त्या बालकांना पांडुपुत्रांनी अन्न,वस्त्र, निवारा, आरोग्य व गुरुकुलीन शिक्षण या मूलभूत गरजा

पुरवल्या असत्या. मात्र त्या बालकांना मातेचा सहवास मिळणार नाही.

हे सर्व उमाळे दाटून येताच सर्व स्त्रिया रुदन करू लागल्या. तसं सेनानायकाच्या मुख्य स्त्रीच्या पाठीवर हात फिरवून पांचाली मार्दवाने म्हणाली, " हे भद्रे! तूच विचार कर. किंबहुना तुम्ही सर्वजणीही विचार करा. मातृतुल्य प्रेम, ममता अन् वात्सल्य साक्षात परमेश्वरही देऊ शकत नाही. मातेच्या वियोगात पालक क्वचितच आपल्या दत्तक पुत्राचे अथवा दुसऱ्यांच्या पुत्राचे प्रेमाने संगोपन करतात. आता तुम्ही माझंच उदाहरण पाहा. वनवासाच्या काळात माझ्या पुत्रांच्या संगोपनाचे दायित्व माझ्या बंधूंवर सोपावले. परंतु त्यांच्या भार्या मंदाकिनी व हिरण्यगर्भा माझ्यासारखं प्रेम माझ्या पुत्रांना देऊ शकल्या नाहीत. म्हणून तुम्ही सर्वजणी आपल्या निर्णय निरस्त करा. कारण तुम्ही सांगितलेला हा अधिकार एका पत्नीला असला तरी, एका मातेला नसतो."

द्रौपदी प्रारंभीस जरी सम्राज्ञीच्या अधिकाराच्या व कर्तव्याच्या वाणीत बोलली होती, तरी नंतर तिच्या शब्दांतून तिच्या मातृहृदयाच्या अस्फुष्ट उद्गार प्रगटत होता······

# ७७

आपल्या भावनांच्या अपूर्ण उद्रेकानंतर आणि अन्य पांडवस्त्रिया, कौरवस्त्रिया व सैनिकांच्या विधवा भार्यांचे सांत्वन करून झाल्यानंतर द्रौपदी स्वतः एकटीच राहुटीत बसली होती.

तिचे पतीदेखील आपल्या तंद्रीत आपापल्या कक्षात होते. तेही शोक व्यक्त करत बसले होते.

मात्र द्रौपदी कोणत्याही प्रकारचा शोक व्यक्त करत नव्हती. तिचे अश्रू जणू गोठून गेले होते.

तिचे कुटुंब पूर्णतः उध्वस्त झाले होते. तिचा पिता, दोन्ही भ्राते तसेच तिच्या भ्रात्यांचे पुत्र, याशिवाय तिचे स्वतःचे पुत्रही. तिच्या वंशाचा संपूर्ण विच्छेद झाला. नव्हे, नव्हे, तिच्या स्वप्नांचा विनाश झाला.

तिने आपल्या पुत्रवधूसह व पौत्रांची स्वप्ने पाहिली होती, एका सामान्य मातेने पहावी तशी. आणि असामान्य मातेची असावी, तशीही तिची स्वप्ने होती. तिच्या पुत्रांनी आपल्या पराक्रम,प्रताप, कीर्ती, धर्मनीतीचे आचरण तसेच राजनीतीच्या बाबतीत त्यांच्या

पित्यांनाही मागे टाकावे अथवा युद्धात शौर्याचे उत्तम प्रदर्शन करून यावच्चंद्रदिवाकरौ अजरामर व्हावे.

ही दोन्ही प्रकारची स्वप्ने आकार घेण्यापूर्वीच भंगली होती. जणू प्रतिपदेलाच अमावस्या झाली होती. रथसप्तमीलाच सूर्यग्रहण झाले होते. आकाशात सूर्य असूनही सर्वत्र अंध:कारच अंध:कार दाटला होता. अग्निगर्भ स्वतःच्या उदरात घेणारा सागरही स्वतःच इतका वडवानलाने प्रज्वलित झाला होता की, अजून अग्नी धारण करणं त्याला शक्य होईना. हेच द्रौपदीच्या बाबतीत घडत होते.

तेरा वर्षापूर्वी तिला हेच वाटत होते, जेव्हा तिच्या सन्मानाचे हनन झाले होते.

आजही तिला हेच वाटत होते, आता जेव्हा, तिच्या सर्वस्वाचे खंडन झाले होते.

आता कोण राहिले होते तिचे?

हो,जीवित होते ना तिचे पाचही पती. तिला मातृत्व देणारे व स्वतः पितृत्व ग्रहण करणारे तिचे पती अन् तिच्या पुत्रांचे पिता जिवंत होते ना!

परंतु काळाने त्यांच्या पितृत्वाच्या नि तिच्या मातृत्वाच्या खुणा पुसून टाकल्या होत्या. तरीही त्यांच्या पितृत्वाच्या खुणा थोड्या का

होईना, मागे उरल्या होत्या, त्यांच्या अन्य पत्नींच्या पौत्रांच्या स्वरूपात.

मात्र तिच्या मातृत्वाच्या सर्वच खुणा मिटल्या होत्या. एकही खुणही मागे राहिली नव्हती, हे सांगण्याकरिता की ती माता झाली होती.

तिने अभावितपणे आपल्या कृश उदरावर हात ठेवला. याच उदरातून ते पाचही कोमल- सुकुमार जीव जन्मले होते.

तिने प्रतिविंध्याचा जेव्हा गर्भ धारण केला होता, तेव्हाच्या घटना तिला आठवल्या.

प्रतिविंध्य तिच्या उदरात असताना, ती एखाद्या युवराजाप्रमाणे राज्यावर, मंत्रीवर व अमात्यांवर अधिक अधिकार गाजवू लागली होती. पांडवानाही आपल्या भावी सम्राट अन् युवराजाचे जन्मापूर्वीच कौतुक होते.

नंतर सुतसोमाच्या वेळी भालेफेकीचे डाव:- आघात व प्रत्याघात हे सर्व जाणून घेण्याची तिला प्रकर्षाने इच्छा होती. हेच भीमसेनाला आश्चर्यकारक वाटत होतं.

अर्जुनपुत्र श्रुतकर्म्याचा गर्भ धारण केल्यानंतर तिला गदायुध्दाचे डावपेच- प्रक्षेप, विक्षेप,परिक्षेप तसेच अभिक्षेप जाणून घेण्याचे डोहाळे लागले होते.

शतानिकाचा गर्भ उदरात असताना तिला ‘ब्रम्हवादिनी' होण्याची स्वप्ने पडू लागली होती अन् श्रुतसेनाच्या जन्मापूर्वी पांचाली जिह्म, नालीक, अर्धनालीक,सर्पमुखी,गरुडमुखी, इंद्रजालीय, क्षुर, क्षुरप्र, नाराच इत्यादी बाणांचे संज्ञान सहदेवाला कथन करत होती.

जेव्हा हे पाचही पुत्र जन्मले, तेव्हा पांडवांना व तिला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त झाले होते. पांडवांना आपले कल्पित आणि इच्छित असलेले बालपण आपल्या पुत्रांमध्ये अवतरलेले आहे, असे वाटत होतं. कारण त्यांना बालपणी पितृसौख्य व संपत्तीसुख लाभले नव्हते.

आपल्या या पूर्वाश्रमीच्या दुःखाचे सावट आपल्या पुत्रांवर पडू नये म्हणून पांडव सदैव प्रयत्नरत असायचे. पाचही पांडवांपैकी एक तरी पांडव आपल्या सेवकांसमवेत आपल्या पुत्रांच्या मागे- मागे असायचा.

याउलट पांचाली अधिक काळ आपल्या राजकार्यांमध्ये व्यस्त असायची. त्यामुळे ती आपल्या पुत्रांना अधिकतर वेळ देऊ शकली नाही.

पाचही पांडवांना, राजमाता कुंतीदेवींना, अतिथींना काय हवे नको ते पाहण्यातच तिचा दिवस निघून जाई. ती इतकी सर्व कार्ये करत असल्यामुळे आपल्या पुत्रांच्या सहवासात अधिक काळ नाही राहू शकायची. तिच्या पुत्रांचे प्रतिपालन तिच्या सख्या तसेच दासी करायच्या.

हे सर्व स्मरून तिला पश्चात्ताप वाटला, ती खंतावली. कारण ती वनवासापुर्वी आपल्या पुत्रांना वेळ देऊ शकली नाही, अन् नंतरही ती त्यांना पुरेसा वेळ देण्यापूर्वीच सर्व जण स्वर्गलोकी प्रस्थान करते झाले………..

आयुष्याच्या धकाधकीच्या प्रवासात तिच्या हातून अनमोल असे काही निसटून गेले होते.

पतिपरायणा पांचालीने तिच्या पतींच्या सुख-दुःखात,त्यांच्या संकटकाळात त्यांच्यासमवेत कालक्रमणा केली होती. मात्र बारा वर्षांच्या वनवासाच्या काळात ना पुत्रांसमवेत पांचाल देशांमध्ये राहू

शकली, ना इंद्रप्रस्थाच्या सुखद काळात आपल्या पुत्रांना वेळ देऊ शकली.

तिचे मन दुःख, वैफल्य, निराशा, पश्चाताप व विभीषिका अशा संमिश्र भावनांनी भरून गेले होते.

तिला वाटत होते, का अट्टाहास धरला होता तिने युद्धाचा? त्यामुळेच तिच्या परिवाराचा विनाश झाला. त्यामुळेच युद्धजीवी सामान्य सैनिकांपासून अनेक राजांपर्यंत असंख्य लोक मृत्युमुखी पडले. हे सर्व तिच्या मुक्त केशांमुळे घडले ना?

“तू असा अतार्किक विचार का करतेस, भावुक पांचाली!” तिच्यातील विवेकी पांचाली म्हणाली. “तुझ्याही जन्मापूर्वीच पांडव- कौरवांची तसेच अन्य राजांच्या वैराची बीजे पेरली गेली होती. ते राजे फक्त आणि फक्त प्रतिशोधाकरिता लढले होते, कौरव- पांडवांच्या पक्षात······.”

“तरीही मी पांडवांना युध्दाकरीता उद्युक्त करायला नको हवं होतं.” तिने म्हटले.

“तू कितीही उद्युक्त केलं तरी, पांडव सामवचनांचा शांतीघोष करत होते ना? दुर्योधनच युद्धाचाच आग्रह धरत होता, म्हणून शेवटी

विवशतेने त्यांनी युद्ध केले. म्हणजेच त्यांना न्याय अनेच्छित होता असे नव्हे. परंतु शांतीमूर्ती धर्मराजांनाच हे सर्वविध्वंसक युद्ध नको होते. म्हणून कृष्णाने त्यांना ‘कामगीता ' कथन करून त्यांना युद्धप्रवृत्त केले. मात्र या सर्वांमध्ये तुझा दोष नव्हताच, पांचाली. पांडवांनी जर तुझ्या इच्छेनुसार तसेच उत्तेजनेकारणे युद्ध करण्याचे संयोजित केले असते, तर तेरा वर्षांपूर्वीच युद्ध नव्हे, द्वंद्वयुद्ध झाले असते.” पांचालीच्या विवेकाने तिचे सांत्वन केले, “पांडवांना समयकराराच्या धर्माचे पालन करायचे होते.”

“मात्र माझी ही भयंकर प्रतिज्ञा- केश मोकळे सोडण्याची प्रतिज्ञा उचित होती का?”

“ती प्रतिज्ञा म्हणजे तुझ्या आत्मसन्मानाचे रक्षण होते. कौरवांनी तुला जी अनन्वित पीडा दिली,अपमान केला. त्या अपमानाहून अधिक घोर तुझी प्रतिज्ञा असली तरी, तुझ्या जीवनात कित्येक भयंकर घटना घडलेल्या आहेत. त्या घटनांतही तुझा दोष नव्हता.”

जगात एकच न्यायसभा असते, तेथे मनुष्याने स्वतःला कितीही दोषी ठरविले तरी, त्या न्यायसभेचा न्यायदाता मनुष्याला निर्दोष

ठरविण्याचा प्रयत्न करत असतो. ती न्यायसभा असते व्यक्तीचे मन. न्यायदाता असतो तो व्यक्तीचे सत्व!

काही क्षणांनी पांचालीचे मन स्थिर झाले. तिला वाटले, आपण या महायुध्दाचा दोष स्वतःवरच ओढवून घेऊन आपण महाशक्तिमान कर्ताकरविता परमेश्वराचा अवमान करत आहोत. याशिवाय या युद्धाविषयी मनात पश्चात्ताप वाटत असेल व पुत्रशोक वाटत असेल, तर आपण खचून गेलेल्या तसेच संन्यस्त होण्याची इच्छा करणाऱ्या पांडवांना धीर कसा देऊ शकतो आणि आपल्या प्रजाजनांची कशी काळजी घेऊ शकतो?

म्हणून आपण शांत राहणे आवश्यक आहे. आपलं दुःख मनाच्या तळाशी टाकून देणे आवश्यक आहे. आपण स्वतः धैर्य धारण करून पांडवांना- प्रजाजनांना त्यांच्या दुःखातून उभारायला साह्य करणे आवश्यक आहे. हे सर्व करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याकरिता आपल्या पुत्रांच्या मृत्यूचा शोक करणे थांबवले पाहिजे. कारण आपल्या पुत्रांनी- प्रतिविंध्य, सुतसोम,श्रुतकर्मा,

अभिमन्यू तसेच शतानिक-श्रुतसेनाने आपल्याकरिता- आपल्या पतींकरिता बलिदान दिले आहे. आपण शोक करुन ह्या बलिदानाला व्यर्थ ठरवू नये, हेच श्रेयस्कर आहे.

एखाद्या वीरमातेचे अश्रू अधिक काळ वाहत राहिले, तर पुत्रांच्या बलिदानाला शोकार्थ प्राप्त होतो. पांचालीने विचार केला, आपणही वीरमाता आहोत. आपल्या कुशीत जन्म घेतलेले पाचही पुत्र व सर्वात प्रिय पुत्र- घटोत्कच तसेच अभिमन्यू या सर्व कुलदीपकांनी कुलाची कीर्ती अजरामर करवूनच स्वतःच्या प्राणाची आहुती दिली आहे. त्याकारणे विकल अश्रू ढाळून आपण त्या बलिदानाचे मोल उणवायचे नाही.

असं म्हणून पांचली धैर्याने उठली. तिने आपले अश्रू तर्जनीने निपटून काढले. तिने आपलं मन कठोर केलं होतं. आता ती आपल्या पुत्रांच्या बलिदानावर रडणार नव्हती. तिने खूप दुःख केले होते, आपल्या परिवाराच्या मृत्यूवर!

आता पुरे! तिने मनोमन स्वतःशी म्हटले. असं म्हणून ती राहुटीबाहेर पडली.

ती मंदपणे पावले टाकीत पांडवाच्या राहुटीत गेली. पांडवाच्या राहुटीतही मंदपणे दीपक जळत होते. मात्र पांडव व्यजनाने दीपक विझवत होते.

ते पाहून द्रौपदीला आठवलं, कुंतीने तिला सांगितलं होतं की पांडव जेव्हा जेव्हा दुखी अथवा उद्विग्न व्हायचे, तेव्हा तेव्हा असेच दीपक विझवायचे, अगदी बालपणापासून.

त्यात पाचांच्या मनातील अस्वस्थता,उद्विग्नता अशा तऱ्हेने प्रकट होताना पाहून ती अत्यंत दुःखी झाली. ती आल्याचे पांडवांना जाणवलेच नाही. कारण ते दुःखात होते.

"प्रणाम,आर्य!" पांचालीच्या स्वराने पांडवांची तंद्री भंगली.

"आलीस!" युधिष्ठिरदेखील उद्विग्न झाला होता, "आमचे सर्व कुलदीपक विझले. तो बभ्रुवाहन फक्त जिवंत राहिला. आमचे इतर पौत्र सुरक्षित आहेत. मात्र उत्तरेच्या गर्भातील परिक्षीणाचे मात्र प्राण संकटात आहेत."

"अश्वत्थाम्याचे ब्रम्हशिर अस्त्र व माझ्या शस्त्रातून उडालेल्या या ठिणग्या उत्तरेच्या गर्भावर एव्हानाच कोसळल्या असतील." अर्जुनाने म्हटले," मी जर ऐंद्रजालिक सूर्यबाणाचा प्रयोग केला

असता तर, कदाचित हा अपघात टळला असता. मात्र त्या स्थितीत मी हतवीर्य झालो होतो.”

“अर्जुना तू कधी हतवीर्य होत नाहीस?” नकुलाने त्रासिक स्वरात म्हटले, “ युद्धाच्या वेळीही तू असाच हतवीर्य झाला होतास!”

“अन्य पौत्रांची स्वतःची राज्ये आहेत. मात्र द्वारकेचे राज्य कृष्णाचेच व त्याच्या पुत्रपौत्रांचे आहे. त्यामुळे अभिमन्यूच्या पुत्रालाच हस्तिनापूरचा भावी राजा म्हणून आपल्याला घोषित करावचं लागेल.” सहदेवाने म्हटले.

इतक्यात राहुटीचा नेपथ्य सारत कृष्ण राहुटीत प्रवेशला, “युवराज सहदेव, आपण द्वारकेचा विषय काढूच नका, कारण मी द्वारकेचा भूभाग समुद्रदेवाकडून घेतला आहे. तो प्रदेश समुद्रदेव परत घेणार आहेत.”

“कृष्णा, जे काही बोलायचे आहे, ते स्पष्ट बोल. आम्ही अशा उद्वेगात असताना तरी तू असा गूढार्थाने बोलू नकोस.” युधिष्ठीराचा दुःखमिश्रित उद्वेग अजूनही शमला नव्हता.

“मी कसा सांगू? तुमच्यावर, विशेषतः माझ्या प्रिय सखा व सखीवर- अर्जुन व द्रौपदीवर आघात होईल.” कृष्ण आसनावर विषण्णतेने बसला.

“होऊ दे.” अर्जुनाने भावनावेगाने म्हटले, “कृष्णा, यापूर्वी आम्ही खूप वज्राघात झेलले आहेत. तू आमची चिंता करू नकोस.”

“राजमाता गांधारीने तुम्हा सर्वांना शाप देऊ नये म्हणून मी तिचा क्रोध शांत करण्यासाठी तिला एकांतात भेटायला गेलो होतो.” कृष्णाचे शब्द ऐकून अर्जुनाने भयकंपित स्वरात मात्र क्रोधाने म्हटले, “म्हणजे तू त्या हिंस्त्र मगरीच्या मुखात हात घातलास?”

“म्हणजे तू त्या क्रोधित नागिनीच्या शेपटावर पाय दिलास?” नकुलाने तोच प्रश्न वेगळ्या पद्धतीने विचारला.

“तर तिने निश्चितच गरळ ओकली असेल.” युधिष्ठिर चिंतित झाला.

“कृष्णा, त्यांनी माझ्या पतींना शाप दिला तर नाही ना?” द्रौपदीचा प्रश्न.

“तिने गरळ ओकली म्हणजे शाप दिला, मात्र मलाच.” कृष्णाने म्हटले.

“शाप दिला? काय शाप दिला?” अर्जुनाने विचारले.

“अर्जुना! तुला कसं सांगू?” कृष्णाने स्वतःच्या मस्तकाला हात लावला, “ तिने मला शाप दिला की माझी द्वारका समुद्रात बुडेल. ज्याप्रमाणे द्वारकेभोवती असलेल्या समुद्राचा प्रवाह जलप्रलयाचे रूप घेऊन द्वारकेवर कोसळेल, त्याप्रमाणे यादवांतील सूक्ष्म वैराची ठिणगी वणव्याचे रूप धारण करेल. त्यामुळेच मद्यपान करून सर्व यादव विवेक गमावतील आणि एकमेकांची हत्या करतील. त्यानंतर माझे अत्यंत सामान्य रीतीने निर्वाण होईल.”

त्याने कथन केलेला शाप ऐकून क्षणभर सर्व पांडव- पांचाली स्तंभित झाले.

काही क्षणानंतर······

” उत्तम! काय दूरदर्शिता आहे!” युधिष्ठिराचा औपरोधिक स्वर.

“आणि काय राजनीती आहे!” नकुलाने म्हटले.

“ काय भेदनीती आहे राजमाता गांधारीची! तिने तुझ्याआडून आमच्यावर वार केला आहे!” सहदेव क्षोभाने म्हणाला.

“आमचे पितृकुल विनष्ट झाले आहे,आता आमचे मातृकुलही नष्ट होणार.” युधिष्ठीराने दुःखाने म्हटले.

“आता नव्हे, छत्तीस वर्षांनी!” कृष्णाचे शब्द ऐकून पांडवांनी अर्धवट सुस्कारा टाकला, “ म्हणजे विपत्ती टळली नाही, मात्र निदान 36 वर्षे तरी पुढे ढकलली गेली.”

“मात्र मद्यपान, मदिराक्षी, द्यूत व मृगया या चारही व्यसनांचा अतिरेक केल्याकारणे मनुष्याचा विवेक नष्ट होतो. त्यामुळे तो स्वतःची प्रतिष्ठा, सन्मान तसेच स्वतःचे बंधु- बांधवांचाही विघात करताना मागेपुढे पाहत नाही. म्हणून मी द्वारकेत मद्यपानास निरस्त करण्याचा आदेश देणार आहे.” कृष्णाने निर्णय घेतला.

“तो आदेश देण्यापूर्वी सर्वप्रथम तुझ्या ज्येष्ठ भ्रात्याच्या कक्षातील सुरेचे पेटारे काढून फेकून दे.” अर्जुनाच्या स्वरात उपरोध होता.

“मी समग्र नगरीला आदेश देऊ शकतो, बलरामाला नव्हे.” कृष्ण म्हणाला.

“तुझी विवशता आम्ही चार पांडव पूर्णपणे समजू शकतो. कारण आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचे अयुक्त आदेश पालन करण्यातच आमचे जीवन व्यतीत झाले आहे.” भीमाने असंतोषाने म्हटले.

“तरीही तू शाप टाळण्याचा प्रयत्न करणार नाहीस?” द्रौपदीने विचारले. तिला ज्ञात होते, हा प्रश्नच विफल आहे. एका पतिव्रतेचा शाप देवाधिदेवालाही टाळणे असंभव आहे. वृंदेचा शाप स्वयं देवेश विष्णू टाळू शकला नाही. सीतेचा शाप रावणासारख्या शिवभक्त विद्वानालाही टाळणे शक्य झाले नाही. माझा स्वतःचा शाप कौरव टाळू शकले नव्हते, दुर्वासादि ऋषींची सेवा करुनही.

“तू ज्ञानी आहेस, सूज्ञ आहेस, पंडिता आहेस, विदुषी आहेस. त्यामुळे तू स्वयं जाणते आहेस की हा प्रश्नच व्यर्थ आहे. तरीही का?” कृष्णाने विचारले. त्याच्या स्वरात विवशता होती. त्याचा स्वरावरून पांडव- द्रौपदीला कळले की तो हा शाप टाळू शकणार नव्हता.

“उचितच आहे कृष्णाचे शब्द, पांचाली! एखाद्या सत्वशील अथवा तपवान व्यक्तीने आपल्या शक्तीच्या साहाय्याने प्रत्यक्ष परमेश्वरालाही शाप दिला, तरी स्वयं परमेश्वरही तो टाळू शकत नाही.” सहदेवाने म्हटले.

“आर्यपुत्र! हेच विचार माझ्या मनात आले होते. किंतु एका सखीची चिंता असा प्रश्न विचारत होती. मात्र एक विदुषी असाच वास्तवपूर्ण, तर्कसंगत विचार करत होती.” द्रौपदीने सहदेवाच्या शब्दांचे समर्थन केले, किंतु खेदाने.

“ पांचाली, चिंता करू नकोस. अजूनही 36 वर्षे आहेत. कृष्ण आपल्या परीने प्रयत्न करेल ना हा विनाश टाळण्याचा?” असं म्हणून अर्जुनाने कृष्णाला विचारले, “काय केशवा?”

कृष्ण निरुत्तर झाला. त्याला कळेना,आपण पांडवांना हे कसं सांगावं की आपणच या सर्व यादवांचा विनाश करणार आहोत⋯ ⋯.

“ नाही, नाही, मी कुणाचेच ऐकणार नाही.मी म्हटलं ना , मी माझ्या इच्छेने हे करणारच! युयुत्सूवर राज्यभार सोपवून मी संन्यस्त होऊन वानप्रस्थ करणार आणि तुम्ही सर्वही अशा परिस्थितीत खुरडत- रखडत जगण्यापेक्षा वनात जाऊन खरीखुरी शांती प्राप्त करणेच हितकारक ठरेल. त्यामुळे मी संन्यास घेणार व तुम्हीदेखील संन्यास ग्रहण करावा.” सुतकाची वस्त्रे धारण केलेला युधिष्टिर संन्यास धारण करण्याचा आग्रह धरून बसला होता.

“अरे,भ्रात्या युधिष्ठिरा! तू अर्जुनाप्रमाणेच संन्यस्त होण्याच्या गोष्टी करतो आहेस. म्हणून मी तुला ‘कामगीतांचे ’ कथन करतो आहे, ते ऐक. इच्छा, महत्वाकांशा, आसक्ती ,मोह तसेच लोभ सदैव अहितकारकच असतात, असे नव्हे.” आपल्या पीतांबरावर श्वेतवस्त्र लपेटून घेत कृष्ण म्हणाला.

“पुरे! पुरे! मी याच ‘कामगीतांमुळे' युद्धाला प्रवृत्त झालो. त्याचे परिणाम हे असे एवढे झाले.” युधिष्ठिर संतप्त झाला.

“शांत हो! युधिष्ठिरा, इतके उद्विग्न तसेच विचलित होणे तुला मुळीच शोभा देत नाही.” कृष्णाने कठोरस्वरात म्हटले.

“तर, मी काय करू? मी या परिस्थितीत कायापालट घडवून आणू शकतो, का? मला ते संभव आहे का?” युधिष्ठिराचा उद्वेग अजूनही शमला नव्हता.

“भ्रात्या! सखा सदैव म्हणतो,की जे काही घडतं, ते परमेश्वराने घडवून आणलेलं असतं.” अर्जुन म्हणाला.

“म्हणून तू शांत हो.” भीमाने म्हटले.

“आपल्या उसळत्या उद्वेगाला नियंत्रित कर, ज्येष्ठा! आणि स्वतःच्या विवेकाला जागृत कर.” सहदेवाने युधिष्ठिराला कठोरपणे सूचित केले, “तू सर्वप्रथम शांत मस्तिष्काने विचार कर,तेव्हा तुला हेच कळेल······”

“तुला कळेल की या युद्धाचे कारण फक्त पांडवच नव्हे तर, कौरवही आहेत. म्हणून तू पश्चाताप करू नकोस.” नकुलाने सहदेवाचे वाक्य पूर्ण केले.

“तुम्ही सर्व म्हणत असाल,तर मी पश्चाताप करत नाही. मात्र माझ्या मनातील विरक्ती कशी जाईल?” युधिष्ठिराने म्हटले.

“तोच आग्रह? संन्यास ग्रहण करण्याचा, भ्रात्या?” अर्जुनाने विचारले.

“ भ्रात्या अर्जुना ! तसे म्हणजे आपल्याकडे काहीच राहिलेले नाही! ” युधिष्ठिर हताश होता, “ आपण ज्या राज्यासाठी, ज्या सत्तेसाठी, ज्या अधिकारासाठी लढत राहिलो, जिवानिशी आयुष्यभर संघर्ष केला, ते सर्व काही आपल्याला झालं, ते असं! स्मशानाच्या रुपात!” आता त्याच्या स्वरात असंतोष होता.

“शांत हो, भ्रात्या! अविवेकाने कोणतीही कृती करू नकोस.” कृष्ण म्हणाला.

“कृष्णा! तू काहीच उपदेश करू नकोस. मी ऐकण्याच्या मनस्थितीत नाही.” युधिष्ठिर क्रुद्ध झाला.

परंतु त्याचा क्रोध मावळला. तो शोकाने म्हणाला, “ धनंजया,संजयाचे शब्द उचितच होते. मीच मूर्ख होतो, त्याच्यासारख्या ज्येष्ठाचे म्हणणे टाळायला!

त्याच्या म्हणण्याप्रमाणे आपण वृष्णीच्या अथवा अंधकाच्या राज्यात भिक्षाटन करायला हवे होते. आपण हेच केलं नाही, म्हणून आपण आपल्याच हातांनी स्वतःच्याच ज्ञातिबांधवांची हत्या करण्यासाठी प्रवृत्त झालोत . आपण धर्म पालनात कमी पडलो आहोत. आपले पुत्र, ज्ञातिबांधव समृद्ध राहिले असते व आपणही शांतीचे अनुपालन करीत राहिलो असतो. आपल्याला असा पश्चाताप करावा लागला नसता. स्वतःच्याच बंधु शालकांचा वध करून आपण या जगताला कसले धर्माचरण शिकविणारा आहोत? या क्षत्रियत्वाचा धिक्कार असो. या क्षात्रतेजाचा धिक्कार असो. क्षमाशीलता व संयमाने अन्याय सहन करणे ही नीतीतत्वे असतात, असे मला वाटते. स्वकीयांची हत्या करून जर मी त्रिलोक्याचा स्वामी झालो,तरी मी त्रिलोकाचे राज्यही नाकारेन. मला वाटते, राज्य करण्यापेक्षा वानप्रस्थाचा निर्णय उचित आहे. स्वतःचा अहंकार, प्रतिष्ठा, दुराग्रह व श्रेष्ठत्वाच्या भूमिकेच्या लोभापायी आपण हे युद्ध केलं आणि मृतांचे- त्यांच्या बांधवांचे शाप घेऊन जगतो आहोत. आम्हा पांडवा- कौरवांपेक्षा कलेवरच्या मासांसाठी एकमेकांशी झगडणारी गिधाडे तरी बरी. सर्वजणांनी त्याहीपेक्षा अधिक क्रौर्याने रक्तपात केला. आणि मला हे राजसिंहासन नको, ज्यांच्यावर असंख्य मृत शवे रचलेली आहेत.” युधिष्ठिर दुःखमग्न झाला, “माझे शब्द

उचितच आहेत. हे युद्ध करून कोणता विजयाचा आनंद आपण प्राप्त केला? हा आनंदही दुःखाकारणे गढूळ झालेला आहे! या दुःखाचे व संहाराचे कारण ते दुष्ट कौरव आहेत, तरीही जनतेच्या दृष्टीने दोषी कोण तर आपणच. मात्र या सगळयात आपला दोष काय होता? आपण विवशतेपायी युद्ध केलं, व या युध्दाने आपलाच विध्वंस केला. हा विजय आम्ही आनंद, गर्वाने उपभोगू शकत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. आपल्याला स्वर्गातही स्थान मिळणार नाही. आमचे दुर्दैव पाहिलेस, कृष्णा?"

"अर्जुना! सांग मला, आमचा काय अपराध आहे रे,?"

"अपराध एकच, तू द्यूत खेळलास आणि तेही दोनदा." सहदेवाने म्हटले.

"ज्येष्ठ भ्रात्याचा असा अपमान?" अर्जुनाने तलवार उपसली. "मी तुझे प्राण घेईन,सहदेवा!"

"अर्जुना! उचित म्हणतोस तू. असेच परस्पर युद्ध करून आपणदेखील स्वतः ही शिक्षा भोगू. मात्र तूच सांग, या सगळयांत आपण कसे दोषी आहोत?" युधिष्ठिराने अर्जुनाचा बाहू ओढत विचारले.

“तुझे मौन ‘आम्ही सर्व पांडव दोषी आहेत' हे सांगतंय.”

“ सत्य ते सत्य आहे. प्रत्येक पांडव व प्रत्येक कौरव या युद्धाला कारणीभूत ठरला आहे.” अर्जुन म्हणाला.

“नाही, अर्जुना! कौरवांनीच या निद्रीस्त सिहांना छेडले होते. तेही एकदा नव्हे, वारंवार. ते कौरव पराकोटीचे नीच होते, तमोगुणांचे शिखर होते. त्यांची पातके इतकी मोठी आहेत की त्यांना स्वर्गात स्थान मिळणे असंभव. त्यांनीच अन्य क्षत्रियांना जर असे उद्युक्त केलं नसतं कि ‘युद्धातील मृत्यूनंतर योद्धा स्वर्गात प्रस्थान करतो' तर इतका संहार······.” युधिष्ठिराचे शब्द खंडित करत अर्जुनाने कठोर स्वरात म्हटले, “ हे काय, युधिष्ठिरा? ज्येष्ठ भ्रात्या, आपल्या शब्दांनी निष्कारण आम्हाला कष्ट का देतोस? कौरवांना नष्ट करण्याचे ध्येय पूर्ण केल्यानंतरही तू अस्वस्थ आहेस. ही अस्वस्थता सोडून दे. आणि एवढ्या संघर्षानंतर, वनवासानंतर व विपदानंतर आपण सर्वांनी परिश्रमाने मिळवलेल्या राज्याचा त्याग करण्याचा विचार तरी तू कसा करू शकतोस? शत्रूंचा नाश करून न्यायाचे राज्य करणे, हे तुझे कर्तव्य आहे, हे तू विसरत आहेस. तू तुझे दायित्व झिडकारू पाहतोस. तुझ्या अशाच संकुचित व अविवेकी प्रवृत्तीमुळेच आम्ही

सर्व भ्राते आणि पांचाली वारंवार संकटात पडलो आहोत. आताही तू तसं करू पाहतोस. तू एका प्रश्नाचे उत्तर दे की पांडव षंढ आहेत? पांडव सामर्थ्यहीन आहेत का ? भ्रात्या, या प्रश्नाचे उत्तर दे."

"आपण सामर्थ्यहीन असतो, तर आपण हे युद्ध केले असते का?" युधिष्ठिर पुनः उद्विग्न झाला.

"म्हणून तू हेच लक्षात ठेव की आपण सर्वांनी हे राज्य सामर्थ्यावर अर्जित केले आहे आणि त्याकरिताच शत्रूचा संहार करणे क्षत्रियांचे अटळ कर्तव्य असते आणि तू स्वकीय- परकीय असा भेद करतोस? याचाच अर्थ तुझी समानाभूति दांभिक आहे व तुझे शोकमग्न होणे ही. हे शक्य नव्हे, तुला युद्धाचे परिणाम ज्ञात नव्हते. तुला हे ज्ञात नव्हते का,युद्ध म्हणजे स्वकीय- परकीयांचा दोहोंचा विनाश असतो. तुला हे नव्याने ज्ञात झालं वाटतं! तू असे मिथ्याचारण का करतो आहेस? तू हे सर्व जाणून-बुजून करतो आहेस का, जेणेकरून तुला कोणत्याही दायित्वाचे वहन करायला मिळणार नाही. दायित्व निर्वाहनाची कर्तव्ये तुला ठाऊक नाही का? एका राजाकरिता त्याचे राज्यच गृहस्थी तसेच संन्यास असतो. आप्त जरी दुर्जन असले तरी, त्यांचे निर्मूलन करणे ही राजाची इतिकर्तव्यता असते, हेच नीती शास्त्रातील वचन आम्ही गुरुकुलात असताना

शिकलो होतो, हे स्मरणात आहे ना? कौरवांनी आपले सर्वस्व हरण करून कृष्णेचा अपमान करुन आपल्यावर केलेल्या अन्यायाची, कर्माची फळे भोगली आहेत. तरी तू हे विसरलास कि आपण न्याय्य युद्ध लढलो आहे. मला ज्ञात आहे, तुला भिक्षाटन करण्यातच अत्यंत रुची आहे, राज्य करण्यात नव्हे. तरीही तुला यज्ञ करावे लागतील, राज्य करावे लागेल." अर्जुन घणावर घाव घालीत होता.

युधिष्ठिराची मनस्थिती पाहून व अर्जुनाची तलवारीप्रमाणे वार करणारी वाणी ऐकून पांचाली चिंतित झाली.

"आर्यपुत्र अर्जुन! शांत व्हा. कृपया आपल्या ज्येष्ठाशी या स्थितीत तरी असे कठोर भाषण करू नका. आपले ज्येष्ठ दुःखमग्न आहेत. त्यांना या युद्धात इतके भ्रमित व शोकग्रस्त केले आहे, की त्यांना समजतच नाही, की ते कुठले वितर्क करताहेत."

पांचाली चे शब्द ऐकून युधिष्ठिर म्हणाला, " कल्याणीचे म्हणणे अगदी उचित आहे. तू मला समजून घे. द्यूत खेळणे अनुचित असूनही व द्रौपदीचे पणन्वयन अनुचित असूनही तू माझ्या त्या दोन्ही कृतीचे सदैव समर्थन केलेस. मात्र या वेळी तुझे कटू शब्द ऐकून मनाला वेदना झाल्या. मला वाटलं होतं, माझा धनंजय निश्चितच माझा पक्ष घेईल. मात्र अर्जुना! मी ज्ञानी लोकांच्या मार्गाचे अनुकरण करणे

श्रेयस्कर मानतो. वानप्रस्थाश्रम हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे, असेच मला वाटते. “ त्याचा आग्रह पाहून नकुलाने आपला अधर दाताखाली रगडच म्हटले, “ भ्रात्या! तू वनवासाची तेरा वर्षे वेगळे काय केले आहेस? तू गृहस्थाश्रमातही वानप्रस्थाची कर्मे केली आहेस.”

“मला ज्ञातच आहे, तू अव्यवहारी आहेस, तू अविवेकी आहेस. हे राजा, तुझे विचार एखाद्या दायित्वहीन मूढ व्यक्तीला शोभणारे आहेतच. तू वेदविद्या संपन्न असलास तरी, हा प्रलाप एखादा मुर्खासारखा तू करतो आहेस. तू असा रानोमाळी भटकला तर, या पृथ्वीला कोण अंकुश ठेवेल? अन् तुझे सशरीर स्वर्गात प्रस्थान करण्याचे स्वप्न पूर्ण कसे होणार? मला हेच कळत नाही, युद्धापूर्वी तू युद्धज्वर ग्रहण केला होतास, नि आता तुला हा कुठला ज्वर चढला आहे? मला वाटते, तुला आलस्य प्रवृत्तीची बाधा झाली आहे, तर तू स्वतः युद्ध का केलेस व आम्हालाही का युद्ध करावे लावलेस? म्हणून असे अतार्किक विचार करणे सोडून दे व यज्ञ करून प्रजेचे आशीर्वाद ग्रहण कर. आणि एकच बाब लक्षात असू दे की तुझ्या आचरणाकारणे पांडवाची सदैव निंदाच होईल व मी ते सहन करणार नाही म्हणून तू असे अनार्गल प्रलाप करु नकोस.” भीमाने क्रोधाने म्हटले.

“भीमाचे शब्द समर्थनीय आहेत.” अर्जुनाने सहमती दर्शवली.

अर्जुनाचे शब्द ऐकून बुध्दिमान व विवेकी नकुलाने धैर्य साधले, त्याला ज्ञात होते, त्याच्या ज्येष्ठ भ्रात्याला कोणीही कनिष्ठाने उपदेश केलेलं रूचत नाही. तरीही त्याला पलायनवादी विचारसरणीपासून परावृत्त करणे अत्यंत आवश्यक आहे.

“अरे,धर्मा! देवतासुध्दा त्यांचा अग्नि(यज्ञ) गृहस्थाश्रमाच्याच गृहात ठेवतात. अग्निदेव त्याच कुटुंबावर प्रसन्न होतात, ज्या कुटुंबातील प्रत्येकाने कर्तव्य पूर्ण केलेले असते. म्हणून गृहस्थाश्रमाचे व कर्मयोगाचे महत्त्व तू जाणून घेत असेल तर, ते हितकारक ठरेल. वेदांमध्ये म्हटल्याप्रमाणे कर्मयोगामुळे मनुष्य स्वर्गापेक्षा उच्च लोकी जातो. ज्याक्षणी मनुष्याची कार्यक्षमता समाप्त होते, त्या क्षणीच त्याने वानप्रस्थान करणे धर्मसंमत मानले जाते. आणि क्षत्रियाला आमरण कर्मयोग धारण करावाच लागतो. त्याशिवाय कुठलाच पर्याय नसतो. यज्ञ करून दान करणे, हेच त्याचे कर्तव्य आहे. आणि तू जर या कर्तव्याचा त्याग करणार असशील, तर उद्याचे इतिहासकार तुला अशीच दूषणे देतील, “ या युधिष्ठिराला आपल्या कर्तव्याचे पालन करायचे नव्हते म्हणून संन्यासाचे निमित्त

करून त्याने पलायन केले. कारण त्याला दायित्वाचे भान नव्हतेच." नकुलाने छन्नी उचलली होती, " तू पूर्णतः वेदाभ्यास केला नाहीसच. माझ्याप्रमाणे तू वेदांचा सखोलपणे अभ्यास केलाच नाहीस. अरे, वेदांमध्ये असे सांगितले आहे, प्रत्येकाने आपली -आपली कर्तव्य पार पाडल्यानंतरच वन गमन करून संन्यास धारण करायचा असतो! व आपले कर्तव्य निरपेक्ष रीतीने व निष्काम मनाने पार पाडतो तो खरा संन्यासी समजला जातो आणि मला ज्ञात आहे, तुझ्या मनात इंद्रप्रस्थाचा व इंद्रप्रस्थाच्या संपत्तीचा मोह, आसक्ती अजूनही आहे. केवळ वनात प्रस्थान करण्याने तुझ्या कामना, वासना संपुष्टात येणार नाहीत. तू इतकंच लक्षात ठेव, ज्याने सर्व वासनांचा त्याग केला आहे, तोच खरा संन्यस्त तपस्वी. तसाच एक संन्यस्त गृहस्थ नृप होता- सीतेचा पिता आणि मिथिलेचा राजा सुनयनापती जनक. त्यालाही प्रथमतः वाटले जात वाटले होते, वनातच संन्यास साध्य होतो. त्याचा हा भ्रम सुलभा या विदुषीने दूर केला, तसाच तुझा हा भ्रम पंडिता व सुज्ञ पांचाली दूर करेल."

"उचित बोलतोस,नकुला! युधिष्ठिरा! केवळ बाह्य प्रारुपांचा त्याग करून कोणीही सुज्ञ बनत नसतो. जर मनात निर्मळ नसेल तर, चंदनाचे चूर्ण शरीराला चोळण्याचा अर्थ काय? जर मनातच

आकर्षणाचा नि वासनांचा मळ असेल तर, बाह्य त्यागाचा काहीच उपयोग नसतो. दुसरे असे की मनापासून त्याग करण्यासाठी बाह्यरुपाने त्याग करण्याची आवश्यकता नसते. त्याग हा भोगांविषयाच्या औदासिनाशी संबंधित असतो. उदा एखाद्याने मधुर पदार्थ वर्ज्य केले म्हणजे त्याने त्याची वासना त्यागली आहे, त्याने मधुर पदार्थाचे सेवन त्यागले नाही. भोगाविषयी स्वाभाविक उदासीनता नसेल, तर त्यापासून दूर राहून लालसा बळावतेच. ज्ञानी, विद्वान ते भोगच उपभोगून त्या भोगांच्या वासनेतून मुक्त असतात. आणि तसेच ज्ञानी होण्याकरिता राज्यकारभाराचे दायित्व टाळण्यापेक्षा त्यातच राहूनच तू आपले राजकार्य केलेस, तर तुला मनःशांती लाभेल व मोक्षही.'' सहदेवाने नकुलाच्या शब्दाचे समर्थन केले,'' याशिवाय तू सदैव 'अहं' 'मम' बोलणे सोडून दे. ' हे माझ्यामुळे घडलं ' असा अहंभाव तुझ्याच आलाच कुठून? या विश्वाचा नियंता तू आहेस का? नाही ना, म्हणून तू एकच लक्षात ठेव, ज्याला ज्ञात झाले आहे की, 'मम' या शब्दात विघात असतो, तोच खरा ज्ञानी! तोच मुक्तीकडे अग्रेसर होऊ शकतो. त्यामुळेच तो ब्रह्मरूपी आत्म्याचे स्वरूप जाणू शकतो! आणि कृष्णाने पार्थाला कथन केलेलं आहे की ' युद्धात ज्याचा मृत्यू झाला, त्याचा आपणच

वध केला आहे, हे मानणे म्हणजे भ्रष्ट अहंकार असतो. तू हे सर्व जाणतोस तरीही तू असा अयोग्य विचार करतोस, याचे मला नवल वाटत नाही. कारण द्युतावेळीही तू असित देवल मुनींचे हेच वाक्य ‘ द्यूत समुचित नसते' मुखात घोळवतच द्युत खेळला होतास. तरीही मी तुला तुझं स्थान लक्षात आणून देतो. तू आमचा राजा आहेस, आमचा पितृतुल्य ज्येष्ठ भ्राता आहेस, हे सर्व विसरु नकोस. म्हणून असा तर्कहीन विचार करणे सोडून दे व भावनेच्या आहारी जाण्यापेक्षा बुद्धीने विचार करावा, हीच विनंती आहे आम्हा सर्वांची, भ्रात्या!”

चारही पांडवांचे शब्द ऐकून द्रौपदीदेखील उद्वेलित झाली. तिला क्रोध आला, कारण आपले चारही बंधू वेदांतील अंतिम सत्य समजावत असूनही त्याचा काहीच परिणाम न झालेला युधिष्ठिर निश्चल दिसत होता.

“राजन, तुमचे बंधू तुम्हाला कोणत्या महासत्याचे कथन करतात, याचे तुम्हाला तरी भान आहे का? आपण सदैव काहीतरी प्रलाप का करत असता, हे आजपावेतो मला समजलेच नाही. तुम्ही स्वतः मला तसेच माझ्या चारही पतींना द्वैतवनात काय आश्वासन

दिलं होतं, ते तरी लक्षात आहे का? आपणच म्हणाला होता, “ आधिभौतिक, आधिदैविक तापांपासून मुक्त होऊन आपण वनवासानंतर राज्य जिंकू व आपल्या पूर्वीच्या ऐश्वर्याचा त्याचा उपभोग घेऊ.”

त्या शब्दांचे विस्मरण कसे घडले तुम्हांला ? आणि तुम्ही स्वतः कर्ण, शकुनी, कौरवाचा नाश झाल्यानंतर आनंद व निश्चिंतता व्यक्त केली होती, मात्र आता शोक करण्याचे प्रयोजन सांगाल? अन तुम्ही स्वतः मला आश्वस्त केले होते, “ कल्याणी, युद्ध झाल्यानंतर आपण उभयंता अश्वमेध यज्ञ करत आहोत, असे चित्र मला स्पष्ट दिसतंय, तर ते चित्र पुसट झालं का? याशिवाय आपल्या युद्धनीती आखणारा स्वयं कृष्ण आपल्या पक्षात होता, म्हणजे आपण शत्रूचे निर्दालन करूनही आपण काही पाप केले आहे, या विचाराने तुम्ही कृष्णाजिन धारण करून संन्यस्त होण्याचा गोष्टी का करताहात?

दुर्जनांचा संहार करणे व सज्जनांचे रक्षण करणे हे क्षत्रियांचे कर्तव्य या युद्धात आपण पूर्ण केले आणि या युद्धात विनाश होणे अटळ आहे. माझाही स्वतःचा वंश विच्छेद झाला, संपूर्ण पांचाल देश स्मशानात परिवर्तित झाला, स्वयं मीदेखील उद्ध्वस्त झाले आहे, तरीही धैर्य साधून मी तुम्हाला साथ देत आहे. त्याही स्थितीत

आपण सर्व पांडव किती शौर्याने लढलात, याच प्रतापाने कोणा-कोणाचा पराभव केला याची मी प्रशंसा करत आहे. आपण आपल्या भ्रात्यांविषयी आशाजनक उद्गार काढून ते दुःखात खचलेले असता त्यांना का सावरत नाहीत? उलट तुम्हाला हे सर्व सावरताहेत. मी देखील स्वतःचे दुःख सारून आपणास सावरत आहे अन् आपण? ”

द्रौपदीने मान झटकली, “माझ्या श्वसुदेवी राजमाता कुंतीने जे मला कथन केलं, ते सत्यच आहे. ज्येष्ठ भ्राता जर किंकर्तव्यमूढ असेल तर, त्याच्या कनिष्ठ भ्रात्यांनाही नियत कर्तव्य करताच येतच नाही. कारण ते सर्वजण ही किंकर्तव्यमूढाच्या आज्ञाकिंत असतात त्यामुळे ते सर्वजण आपल्या जीवनात समृद्धी, प्रतिष्ठा व आत्मसन्मान सर्वकाही गमावतात. हे सत्य तुम्हां सर्वांविषयी असेल, याची मला तिळमात्र कल्पना नव्हती. आर्यपुत्र, तुम्ही आपल्या राज्याचा व राज कर्तव्याचा त्याग करून आपला अविवेक दर्शवताहात. माझे पाचही पुत्र स्वर्गस्थ झाले आहेत. याशिवाय पांडवांच्या हातून हे राज्य निश्चितच निसटणार, असे दिसते आहे. हे राज्य आपले इतक्या परिश्रमानंतर, इतक्या अपरिमित संघर्षानंतर, इतक्या वर्षांच्या वनवासानंतर प्राप्त केले आहे. कृपया पराक्रमाने लाभलेले राज्य लाथाडू नका. त्यामुळे आपणांसच पश्चाताप, दुःख होईल.म्हणून

आपण राज्य करून सर्व जणांच्या अपेक्षांची पूर्ती करावी,यज्ञ करावे, हेच श्रेयस्कर होईल.”

द्रौपदीचे शब्द एकदम आरपार वार करणारे, हृदयाला भेदणारे होते, एखाद्या तलवारीप्रमाणे अथवा सौदामिनीप्रमाणे!

त्या शब्दांचा इतका परिणाम झाला, की युधिष्ठिर प्रत्युत्तराकरिता विसंवादाकरिता उठून उभा राहिला.

युधिष्ठिराला क्रोध आला. कारण द्रौपदीचे शब्द एखाद्या तलवारीप्रमाणे त्याच्या हृदयात खुपसले होते.

तो काही बोलणार, इतक्यात अर्जुनाने म्हटले, “द्रौपदीचे शब्द मार्मिक आहेत.”

“ नाही! तिचे शब्द तर मर्मावर घाव करणारे आहेत.” युधिष्ठिर पुटपुटला.

“अगदी सत्य!” भीमाने अर्जुनाचे समर्थन केले, “द्रौपदीने जे म्हटले ते अगदी उचित व तर्कसंगत आहे.”

“विदुषी, सूज्ञ द्रौपदी कधीच अनुचित बोलू शकत नाही.” सहदेवाने विश्वास व्यक्त केला.

"फक्त द्रौपदीच नव्हे, तर तुम्ही सर्वजणही अनुचित बोलत आहात. किंबहुना, तुम्ही माझ्या शब्दाचा अनुचित अर्थ काढून निष्कारण मला धारेवर धरताहात, मला दोषी ठरवाहात." युधिष्ठिर सावरा-सावरी करत होता.

"मी स्वयं योगेश्वर कृष्ण आहे, मात्र मलाही तुझ्या शब्दातला अर्थ कळला नाही. तूच सांग, धर्मराजा!" इतका वेळ शांतपणे उभा असणाऱ्या कृष्णाने म्हटले.

"मी तर राजकार्यातील संन्यासाची गोष्ट करत आहे! " युधिष्ठिराने आपले शब्द फिरविले, ही बाब अन्य पांडवाच्या लक्षात आल्याशिवाय राहिली नाही.

"तर आम्ही तेच म्हणत होतो! आम्ही काय वेगळं सांगत होतो? " नकुलाने त्याचा तर्क खोडून टाकला.

"नाही, मी तर राजकर्तव्याविषयी म्हणत होतो. मी जे बोलत होतो, त्याचा संबंध तुम्ही सर्वांनी सांगितलेल्या पलायनवादाशी नाही. मला समजून घ्या. कल्याणी, तू तरी! मी दुःखाने इतका खचलो आहे की माझे माझ्या शब्दावर नियंत्रण राहिले नाही." युधिष्ठिराने स्वतःचे समर्थन केले, "मला समजून घे, अर्जुना! कारण तूच

द्युतसभेतही समजावून घेतले होतेस, भीम ज्याक्षणी माझा हस्तदाह करणार होता. त्याक्षणी तूच माझे नैतिकदृष्ट्या रक्षण केलेस. नाहीतर मी त्या द्युतसभेत ‘स्वार्थी भ्राता व धर्मकृपण पती ' सिद्ध झालो असतो, भीमाच्या शब्दानुरुप.”असे म्हणून त्याने अर्जुनाच्या काळजाला हात घातला.

“त्याच्या शब्दांनी अर्जुन विरघळला,द्रवित झाला. द्युतसभेतही युधिष्ठिराची अवस्था पाहून तो असाच द्रवीभूत झाला होता.

“भ्राता उचित म्हणतो आहे, कृष्णे! निष्कारणच तू भ्रात्याला कठोरपणे बोललीस. तूच नव्हे, तर भीम तसेच जुळे बंधूदेखील त्याला बोचेल अशा शब्दात बोलले, त्यांनी ज्येष्ठाची निर्भर्त्सना केली.” अर्जुनाने युधिष्ठिराला सावरले.

“फक्त माझी प्रिय बंधू नि माझी सखी- पांचाली नव्हे तर माझ्या सख्या, तूही आपल्या ज्येष्ठाची कठोर भाषेतच निंदा केलीस.” कृष्ण उदगारला, “किंतु तू सखी व अन्य भ्रात्यांनी जे म्हटले ते उचितच म्हटले.”

कृष्णाचे शब्द ऐकून अर्जुनाला पश्चाताप वाटला, “मला क्षमा कर, ज्येष्ठा!”

युधिष्ठिराच्या शब्दांतील विसंगती पाहून द्रौपदी व अन्य पांडवांना अत्यंत क्रोध आला होता, मात्र ते मूकपणे उभे होते.

“तुला राजधर्माचे ज्ञान प्राप्त करायचे आहे ना?” कृष्णाच्या शब्दावर युधिष्ठिराने मान डोलावली.

“मी तुला सर्वप्रथम महर्षि व्यास व त्यानंतर भीष्मा कडे घेऊन गमन करतो. ते उभयंता भ्रातेच तुला सत्याचे ज्ञान देऊ शकतील, म्हणजे राजधर्माचेही.” कृष्णाने सुवर्णमध्य काढला.

“ आपण सर्वप्रथम महर्षिकडे गमन करावे. मी राजमाता कुंती,सुभद्रा,उत्तरा,होत्रवाहिनी इत्यादी राजस्त्रियांजवळच राहणार आहे, त्यांच्या सांत्वनार्थ.” पांचालीने म्हटले.

“अवश्य.” युधिष्ठिराने अनुमती दिली.

“आर्यपुत्र, आपण यावे.” पांचालीने असे म्हटल्यावर व अभिवंदन केल्यानंतर पांडव कृष्णासह निघून गेले. तसे पांचालीनेही स्त्रियांच्या शिबिरात गमन

केले.

“पांचाली, मला तुझ्याशी काहीतरी बोलायचे आहे.” राजमाता कुंती द्रौपदीजवळ येत म्हणाली.

“बोला,राजमाते!” द्रौपदीने तिला जल दिले.

“हे सर्व माझ्यामुळे घडलं.” कुंतीने पश्चातापदग्ध स्वरात म्हटले. द्रौपदीने तिला सावरले, “हे काय बोलताहात, आपण? कृपया आपण शांत व्हा.”

“माझ्यामुळेच तुझा वंशविच्छेद झाला,तुझे मातृगृह उध्वस्त झाले,माझे पौत्र मृत्युमुखी पडलेत. माझ्या पौत्रवधू विधवा झाल्या आहेत.” कुंतीच्या नेत्रांत प्रथमतः अश्रू झळकले. किंबहुना द्रौपदी वगळता अन्य राजस्त्रियांनी तरी प्रथमतः पाहिले होते.

“आपण कृपया अश्रू ढाळू नका.” द्रौपदीने म्हटले.

“माझ्यामुळे तुझे वस्त्रहरण घडले, माझ्यामुळेच पांडवांसह तुला वनवास घडला, त्यानंतर इतके भयावह महायुद्ध झाले, इतका विनाश झाला.” कुंती शोकाकुल झाली, “ मीच युधिष्ठिराला द्युतापासून परावृत्त करायचे होते. परंतु माझी मतीच कुंठीत झाली होती. हे सर्व माझ्या कर्मानेच घडले आहे. “

असे म्हणून कुंतीने द्रौपदीचे हात धरले, “ मला क्षमा कर, पांचाली. हे सर्व माझ्यामुळेच घडलं. तिच्या शब्दांचा गर्भितार्थ पांचालीच्या लक्षात आला. कुंतीला निश्चितच पाचही पांडवांमध्ये पांचालीचे विभाजन, पाची पांडवांसह पांचालीचा विवाह,वस्त्रहरण, तसेच युध्द घडण्याविषयी क्षमा मागायची आहे.

द्रौपदीने एक निःश्वास टाकला. कुंतीच्या शब्दांनी तिच्या मनात पूर्वस्मृती पुनः आठवल्या, तिला दुःख झाले, क्रोधही आला होता. परंतु तिने शांतपणे विचार केला, इतकी वर्षे झाली, हे सर्व घडून. मी माझे पंचकपरिणय कधीच स्विकारले आहे, अन् राहिलं ते माझ्या वस्त्रहरणाचं. माझ्या वस्त्रहरणाचा प्रतिशोधयुक्त क्रोध राजमातांनी तेरा वर्षे धारण केला होता. म्हणून त्यांना क्षमा करणं आवश्यक आहे.

“राजमाते! कृपया आक्रंदन करु नका! मी आपणांस कधीच क्षमा केली आहे. याशिवाय आपण पश्चातापदग्ध होऊ नका. जे काही घडून गेलं, ते निश्चितच विस्मरणायोग्य नसलं, तरी सावरण्याजोगं तरी आहे. कारण तुम्ही मला जे प्रेम दिलंत,ममता दिलीत, उचित असा सन्मान दिला आहे,मला स्वतःचे अधिकार व स्वतंत्रताही दिलीत, माझ्या अपमानाचा डंख आपण तेरा वर्षे आपल्या हृदयाशी बाळगला आहे.” द्रौपदीने कुंतीचे सांत्वन केले.

“का डंख उरात बाळगणार नाही? माझ्या पुत्रांच्या चुकांमुळे तुझं वस्त्रहरण घडलं,मात्र त्यांनी तुझं संरक्षणही केले नाही.” कुंती रुदन करू लागली.

“मला ज्ञात आहे, तुझे मन विशाल आहे. तू माझ्या पुत्रांना व मला निश्चितच क्षमा केलं असशील.” पण माझंच मन मला बोचतंच. हेच माझ्या मनातील मोठं शल्य आहे,कृष्णे!”

“आपणच म्हणता ना, जे घडतं, त्यात नियतीच्या योजना असतात. आपली कर्मे देखील नियतीच्या योजनेनुसार घडतात. आपला प्रिय भ्रातनेय (भाचा) कृष्ण देखील असेच कथन करतो, सदैव ‘मी’ केल्याकारणे अहंभाव अथवा न्यूनभाव निर्माण होतो.

म्हणून घडलेल्या परिस्थितीवर शोक करण्यात काहीच अर्थ नाही! आपण कितीही शोक केला, तरी घडलेल्या परिस्थितीत परिवर्तन होणे कदापि शक्य नव्हे.” द्रौपदीच्या शब्दांनंतरही कुंतीचा पश्चाताप दुःखावेग शमला नाही. कुंती रुदन करतच होती. ती द्रौपदीला काहीतरी कथन करू पाहत होती, मात्र तो प्रयास सफल होत नव्हता. कारण अन्य राजस्त्रिया समोरच होत्या. तिला वाटत होते, आपली कसुर सर्वांदेखत कथन केली, तर आपल्या स्नुष्णा आपल्याविषयी काय विचार करतील. मात्र आपण विचार न करताच बोलून गेलो होतो, तत्क्षणी······.

“एकांत! परिहार! फक्त द्रौपदीच माझ्या जवळ थांबेल.” कुंतीने म्हटले, “काहीतरी सांगायचे तिला.”

“ राजमाते, तू देवी द्रौपदीसमवेत मलाही सांगू शकतेस.” सुभद्रेने म्हटले.

“भद्रे, मी ते फक्त पांचालीलाच सांगू शकते व तेही कथन करण्यासाठी मला एकांत हवा आहे. आपण सर्व जणींनी येथून प्रस्थान करणं श्रेयस्करच ठरेल.”असे कुंतीने म्हटले, “ कल्याणी, मला······..”

तसे अन्य पांडव स्त्रियांनी शिबिरातून प्रयाण केले.

"बोला,राजमाते! आपणास जे बोलायचं आहे, जे माझ्यासमोर व्यक्त करायचे आहे, ते अत्यंत गोपनीय रीतीने व्यक्त करू शकता." द्रौपदीने कुंतीला आसनावर बसवीत म्हटले, "आपणास ज्ञात आहे ना कि मी कुठलीही बाब गुप्त राखू शकते. आपण चिंता करू नका. आपण·········"

द्रौपदीच्या शब्दांना रोखत कुंतीने तिचा हात धरून आपल्या बाजूला बसवून घेत म्हटले,"कल्याणी, मला तुझ्याशी अजून एका घटनेसाठी क्षमा याचना करायची आहे. ती घटना म्हणजे मी कर्णाला आपल्या पक्षात वळवण्याकरिता राज्याचा व ज्येष्ठ भ्रातु पदाचा उपयोग केला होता. नंतर माझ्या हातून एक जघन्य पातक घडले. मी कर्णाला म्हटले होते, " जर तू आमच्या पक्षात आलास तर ज्येष्ठ पांडव या नात्याने तुला द्रौपदीही पति म्हणून स्वीकारेल."

हे ऐकून द्रौपदी उत्तेजित होऊन प्रतिक्रिया देईल, असे कुंतीला वाटले होते. मात्र द्रौपदी विचारमग्न होती. तिला नियतीचा हा डाव इतक्या वेगाने प्रहारित झाला नव्हता, कारण कृष्णाशी पूर्वी झालेल्या वार्तालापामुळे तिला हे केव्हाच कळले होते. तिला फक्त एकाच

गोष्टीचे दुःख वाटले होते की कुंतीने तिची गणना पूर्वी विभाज्य भिक्षेत ,तर त्यावेळी देय वस्तुत केली होती.

द्रौपदीने अजून कुठलीही प्रतिक्रिया दिली नव्हती, ती अजूनही मूक होती. तिचे मौन अस्वस्थता, दुःख व विषण्णता अबोलपणे-निशब्दपणे व्यक्त करीत होते.

मात्र तिच्या त्या निरवतेचे कुंतीला आश्चर्य वाटले. एरवी उद्वेलित होऊन अनुचित कृत्यावर अंगार पाखडणारी पांचाली आज मूक का? की आपण तिला अयोग्य समयी हे सत्य सांगितले का? इतक्या दुःखद परिस्थितीत, वंशविच्छेद आणि मातृकुळाचा नाशाच्या शोकात असताना आपण तिला हे सत्य कथन करून दुखावलं तर नाही ना?

तिच्या हृदयात दृढ आघात तर झाला नसेल ना? आपल्याकारणे व आपल्या पुत्राकारणे पांचालीवर काही कमी अन्याय झालेला नाही! आपण आपल्या मुखे तिला तो अन्याय कथन करावा, जो अन्याय आपणच तिच्या नकळत केला होता हे उचित नव्हे. पांचालीला निश्चितच खूपच मोठा धक्का बसला असेल, असे कुंतीला वाटले.

याशिवाय तिने मनोमन म्हटले," ज्या पुरुषाने तिला 'बंधकी' असं म्हणून तिचे वस्त्रहरण करण्याची आज्ञा दु:शासनाला दिली, त्या पुरुषालाच मी तिचेच प्रलोभन दाखवले, हे ऐकून तिला माझा निश्चितच तिरस्कार वाटला असेल."

कुंतीने पांचालीचा स्कंध हलवून म्हटले, "मला क्षमा कर, कृष्णे!" तशी द्रौपदी भानावर आली व ती क्षणात उठून उभी राहिली. तिने कुंतीकडे तीक्ष्ण दृष्टीने पाहत म्हटले, " राजमाते, तुमची ही अपेक्षाच अनुचित पायावर उभी होती. कारण तो नीच सूतपुत्र जरी पांडवाच्या पक्षात आला असता, तरी तुमची आज्ञा मानून त्या दुष्टाला वरण्यापेक्षा मी अग्निदाह केला असता. त्याकारणे माझी प्रतिष्ठा, पातिव्रत्य आत्मसम्मान,स्त्रीत्व तसेच सत्वाचे रक्षण झाले असते."

तिच्या शब्दात तिरस्कार व क्रोधाच्या ठिणग्या झडत होत्या. तिचा तो क्रोध पाहून कुंती मूकच राहिली, पण क्षणभरात-

"मला क्षमा कर, पांचाली!"

“इदमस्तु! मी आपणाला क्षमा केले आहे, आता मला माझ्या शिबिरात गमन करू द्यावे.” द्रौपदीने त्रस्त व आहात स्वरात म्हटले. तिला या सर्व गोष्टीचा मनस्ताप झाला होता.

“आज्ञा आहे!” द्रौपदीची मनस्थिती जाणून कुंतीने वार्तालापाचा समारोप केला.

꩜꩜꩜

“तू शोक करू नकोस, पांचाली! तुझा कर्णाविषयीचा क्रोध व तिरस्कार स्वाभाविक आहे. किंतु काही दिनापूर्वी त्याचा वध तुझ्या प्रियवराने अर्जुनाने केलेला आहे, शिवाय पांडवांच्या पक्षातदेखील त्याने प्रवेश केलेला नव्हता. त्याकारणे राजमाता कुंतीने दिलेल्या प्रलोभन तसेच वचनाची कृष्णछाया दूर झालेली आहे. त्याकारणे तू शांत हो. मनस्ताप करून घेऊ नकोस, विशेष म्हणजे खचून जाऊ नकोस. कारण ज्येष्ठ पांडवाने अजूनही आपला संन्यास धारण करण्याचा निर्णय बदललेला नाही.” स्वयं पांचालीचा

विवेक उद्विग्न पांचलीला शांत करत होता, तिची सांत्वना करीत होता.

पांचाली एकटीच तिच्या शिबिरात बसली होती. पूर्वी घडलेल्या सर्व घटना तिच्या स्मृतीपटलावर आदळत होत्या. यामुळे तिला मनस्ताप, दुःख पीडा होत होती. परंतु तिचा विवेक, धैर्य व संयम तिला सावरण्याचे यथासंभव प्रयास करत होते आणि सफलही ठरत होते.

मनात उमटलेले भावनिक मनोद्वेगाचे वादळ हळूहळू ओसरत होते. पांचालीचे मन सावरत होते.

तिने आपल्या मनाला वैषम्यातून सावरले आणि स्वतःचे सांत्वन करत तिने आपले अश्रू निपटून टाकले. स्वतःच्या मनाला दृढ करीत ती उठली.

तत्क्षणी एक दासी तिच्या राहुटीत प्रवेशली. "समाज्ञी, प्रणाम! मी राहुटीत प्रवेश करू शकते का? आपली अनुमती आहे का?"

"अवश्य!" पांचालीने अनुमती दिली, तशी दासी तिच्या जवळ येत म्हणाली," महाराणी, तुम्हाला पांडवांनी युद्धभूमीवर निमंत्रित केलेले आहे."

“आता का?” पांचालीने नेत्र मिटले. तिला पुन्हा संहाराचे प्रमाण पाहायचे नव्हते.

“महाराणी, पांडूपुत्र पितामहांकडून राजधर्माचे ज्ञान ग्रहण करताहेत. आपण भावी सम्राज्ञी आहात, म्हणून आपणासही या ज्ञानाची आवश्यकता आहे, असे त्यांचे मत आहे.” दासीने मान तुकवून म्हटले.

“ ही माझ्या पतींची आज्ञा आहे?” पांचालीने म्हटले. त्यावर दासी मूक होती.

“तर मी प्रेतरंजित युद्धभूमीवर पुनः प्रस्थान करण्यास सज्ज आहे.” असं म्हणून द्रौपदीने युद्धभूमीच्या दिशेने प्रयाण केले.

तिच्या दृष्टीस पुन्हा तेच दृश्य पडले. सर्वत्र प्रेतांचा खच, त्यांच्या शरीराचे तुटून विखुरलेले अवशेष, अस्थींचे तुकडे, राखेचे जळते ढिगारे, रथांचे अवशेष आणि शोक करणाऱ्या विधवांचे बाहुल्य!

पांचालीने निश्वास सोडला. तिने पाहिले, काही अंतरावर शरपंजरावर पितामह भीष्म पहुडलेले होते. त्यांच्याभोवती सर्व पांडव बसलेले होते.

युधिष्ठिर त्यांना प्रश्न विचारत होता. भीष्म त्याच्या प्रश्नांना उत्तर देत होते.

अकस्मात तेथे द्रौपदी येऊन पोहोचली. तिच्या आगमनामुळे तल्लीन होऊन राजधर्म श्रवण करणाऱ्या पांडवांची तंद्री भंगली. युधिष्ठिराने तिला आपल्या डाव्या हाताला असलेल्या कृष्णाजिनावर आसनस्थ होण्याचा संकेत केला.

तत्समयी पांचाली पितामहांचा चरणस्पर्श करून भूमीवर अंथरलेल्या मृगाजिनावर आसनस्थ झाली.

तिचा स्पर्श जाणवून पितामहांनी दृष्टी झुकवून तिला आशीर्वाद दिला व त्यांनी पुन्हा राज्यधर्माविषयी कथित करण्यास आरंभ केला, मात्र त्यांच्या स्वरात ठामपणा नव्हता.

“ कोणी नागरिकाने राज्याधिकाऱ्याविरुद्ध तक्रार केली असल्यास त्या तक्रारीचे निवारण करावे. मात्र एखाद्या स्त्रीने आपल्यावर अन्याय व शोषण होत असल्याचे सांगितले असल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नये, तिच्या समस्येचे निवारण करावे.

यदाकदाचित एखाद्या स्त्रीचा अपमान होत असेल, अथवा एखाद्या स्त्रीवर अन्याय-अत्याचार होत असेल, तिच्याविषयी, तिच्या चारित्र्याविषयी कोणी असभ्य भाषेत गरळ ओकत असेल

तर, त्या अपराधास रोखून त्या अपराधी व्यक्तीला दंड देणेच राजपुरुष अथवा राजाचे कर्तव्य असते, हा देखील राजधर्म असतो.''

हे ऐकून तिच्या नेत्रात अश्रू आले व ओष्ठांवर औपरोधिक स्मित.

पितामह! हा राजधर्म तुम्हाला फक्त मुखोद्गत आहे. मात्र प्रत्यक्षात वस्त्रहरणावेळी कौरवांनी-कर्णाने दुर्व्यवहार केला त्याक्षणी तुम्ही काहीच विरोध केला नाही. किंबहुना कौरवांना दंडितही केले नाही.

तिने तसा प्रश्न बोलूनही दाखविला,''थांबा, पितामह! एका प्रश्नाचे उत्तर द्या.'' पितामहांच्या आख्यानात व्यत्यय आला, तसे पांडव क्रुद्ध झाले.

"त्यांचे बोलणे पूर्ण होऊ दे.'' युधिष्ठीराने म्हटले,''कल्याणी!''

" द्रौपदी, पितामहांच्या आख्यानात व्यत्यय आणू नकोस. " अर्जुनाने म्हटले.

"नाही,पांचालीला प्रश्न विचारु दे!'' कृष्णाने तिचा पक्ष सावरून धरला.

“ज्याक्षणी माझी विटंबना दु:सहरितीने कौरव करत होते, त्याक्षणी तुमचा राजधर्म कुठे होता?” अग्निशिखेच्या अंगाराप्रमाणे तप्त स्वरातील ज्वलंत प्रश्न थेट हृदयाच्या ऐरणीवर आला. त्या प्रश्नावर पितामहची मान झुकली.

“द्रौपदी, तू पितांमहाचा अपमान करते आहेस!” अर्जुन कडाडला. कृष्ण त्याला शांत करु लागला.

“तू कुरुकुलाची कुलवधू आहेस, कल्याणी! म्हणून तू मर्यादेने आचरण कर.” युधिष्ठीराने कठोर स्वरात म्हटले.

“मात्र ज्याक्षणी माझ्याशी कुरुपुत्रांनी अमर्यादित आचरण केले, त्याक्षणी पितामह मूक का होते?” पांचालीचा पुन्हा प्रश्न.

“तिचा प्रश्न उचित आहे, पुत्रा!” पितामहांनी म्हटले,” पांचालकन्ये, मला क्षमा कर! ”

“पितामह! आता क्षमा मागण्यास काहीच अर्थ नाही आणि तसं म्हणजे सर्वस्व हरपल्यानंतर मी देखील सर्वांना क्षमा केलंच आहे. किंतु माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे! ” पांचालीच्या निस्तेज स्वरात तेज पुन्हा प्रकटले.

"पांचाली, हे सत्य आहे. हेच राज्यधर्माचे ज्ञान जे मी तुझ्या पतींकडे सोपवत आहे, ते ज्ञान त्याक्षणीही माझ्या मनोमस्तिकात होते, मात्र त्या राजधर्माचे पालन माझ्या हातून होऊ शकले नाही. कारण मी कुरुसिहांसनाचा सेवक होतो." पितामहांनी पूर्वी प्रमाणे द्वंद्वमयी उत्तर दिले.

हे तर ऐकून आपले अश्रू लपवत पांचाली उपरोधाने म्हणाली, "मला वाटलं होतं, तुम्ही पूर्वीप्रमाणेच हेच उत्तर द्याल."

"पांचाली, यदाकदाचित तू पितामहांच्या आख्यानात असाच व्यत्यय आणणार असशील, तर तू आपल्या शिबिराकडे प्रस्थान करू शकतेस." युधिष्ठीराने रोषाने म्हटले.

"हवेतर आम्हीच तुझ्याकडे हे ज्ञान सोपावू." सहदेवाने तिला आश्वस्त केले, " राज्याभिषेकानंतर."

" इदमस्तु ! प्रणाम, आपल्या आज्ञेनुरूप मी शिबिराकडे प्रस्थान करते." असे म्हणून पांचाली उठली व तिने सर्वांना वंदन केले.

ती वळून पुनः शिबिराकडे चालू लागली. शिबिराकडून आता तिचा हस्तिनापुराकडे नूतन जीवनप्रवास आरंभ होणार होता.

नव्या परीक्षा, नूतन आव्हाने व अनपेक्षित वादळे तिची अधीरतेने प्रतीक्षा करत होती .

🌀🌀🌀🌀🌀

.

(अजूनही बंध अनवसित आहेत)



# परिशिष्ट

१) दु:खाश्रित:- दु:खित.

२) चांडाळ :- प्रेते जाळणारे.

३) शोक-अजिन :- शोक वस्त्र.

४) याता :- जाऊ.

५) अविच्छेद्य :- ज्याचे छेदन करता येत नाही,असा.

६) अप्राज्ञता :- बुध्दिहीनता.

७) चूड लावणे :- धक्का देणे.(अहंकाराला किंवा क्रोधाला)

८) एकस्व :- फक्त एकाच्या अधिकाराखाली असलेले.

९) जेते :- विजयी.

१०) सहोढ :- भ्रात्याचा पुत्र. ( पुतण्या )

११) सूचीपतना :- सुई पडणे.

१२) परिचारक :- सेवक.

१३) विद्वेष :- द्वेष.

१४) सव्यासची :- दोन्ही हातांनी धनुष्य संधान साधू शकणारा.

१५) अश्रुमोचन :- अश्रू ढाळणे.

१६) संशप्तक :- युद्धजीवी राजे.

१७) रुदनस्वर :- हुंदके.

१८) कानीन :- विवाहापूर्वी झालेले अपत्य.

१९) अनवसित :- असमाप्त

२०) सापत्न भाव :- सावत्रपणाची भावना.

२१) दत्तचित्त :- एकाग्र चित्त.

२२) खर्व :- खरब,पैसाचे प्रमाण.

२३) बाहुल्य :- आधिक्य.

२४) यावद्‌चंद्रदिवाकरौ :- जोपर्यंत चंद्रसूर्य आहेत, तोपर्यंत.

२५) वडवानल :- समुद्राच्या गर्भातील अग्नि.

२६) कामगीता :- पूर्वापारपासून कामाचे (इच्छा,कामना,मोह, आसक्ती, काहीशा प्रमाणात लोभ महत्वाकांक्षा) समयोचित महत्त्व व्यक्त करणाऱ्या व पिढ्यानपिढ्या गेय असणाऱ्या गीता – याच काम गीता कृष्णाने युधिष्ठिराला उद्योगपर्वात सांगितल्या होत्या.

२७) मिथ्याचरण :- असत्य आचरण.

२८) किंकर्तव्यमूढ :- कर्तव्यांचे पालन न करणारा.

२९) भ्रातनेय :- भ्रात्याचा पुत्र.( भाचा )

३०) न्यूनभाव :- न्यूनगंड.

३१) इदमस्तु :- ठीक आहे.

३२) कृष्णाजिन :- कृष्णमृगाचे मृगासन.


३३) द्वंद्वात्मक :- द्विधा.

३४) व्यजन :- हातपंखा.


माझी ही महाकादंबरी वाचून कशी वाटली, हे


shaktileelanikita@gmail. com या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.

# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा









## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे सातवं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणी या गावात आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी

ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, प्रथमेश डहाळे, प्रद्युम चिलकेवार असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?